REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला. रविवार ता० ५ माहे नोवेंबर सन १८७६ इ० अंक ४४

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फिरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यास—

वि. वि. दोन तीन दिवसांपासून हवा कांहींशी बदलल्यासारखी झाली आहे. पहाटेस थोडीशी थंडी पडते यावरून आतां पावसाचा अभावच आहे असे वाटतें. तारीख २१ शनवार रोजीं ३।४ वाजतां चांगला पाऊस पडला. बाजारभाव मध्यम आहेत. आलिकडे येथून ज्वारी व गहूं सोलापुराकडे जाण्याचा सपाटा चालला असल्यामुळें ज्वारीचा भाव बराच चढला आहे. येथील विरार कंपनीचे एंजिनियर यांणीं कपास वटण्याचें ( सरकी काढण्याचें ) यंत्र सुमारे सात आठ दिवस झाले चालू केलें. रोज ११२ बोजे सुमारें बारा रेचांवर कांहीं वेळानें वटले जातात. मि० रीड साहेब इरिगेशन डिपार्टमेंटचे मुख्य हे काल येथें येऊन मे० लाटन साहेब स्मा० को. ज० यांजकडे उतरले आहेत. कशाकरितां आले आहेत तें कळल्यावर लिहीन. हल्ली शहरांत दुरुस्ती उत्तम आहे.

आलिकडे टपालखात्यांत एक नवीन निघालेली टूम झळकूं लागली आहे. थोडे दिवसापूर्वीं पुण्याहून पत्र पोष्टपेड आलें त्यावर ( 1 Anna due ) असा छाप होता त्यामुळें पत्र देतेसमयीं शिपायी एक आणा मागूं लागला तेव्हां त्या शिपायासमक्ष तें पत्र वजन करून पाहतां ६ माशांपेक्षा अधिक नव्हतें असें समजलें तेव्हां त्या सबबेचें लेबल त्या पत्रास लावून पत्र शिपायाचे स्वाधीन केलें. परंतु असल्या क्षुल्लक नुकसानीवर लक्ष देऊन आलेलें पत्र घालवावें हें ठीक नाहीं असें मनांत आणून पुन्हा सुमारे २-२॥ कलाकांनीं एका मनुष्याबरोबर एक आणा देऊन पत्र परत आणण्यास पाठविला. तेव्हां वरील इंग्रजी छापावर लालशाईच्या रेघा मारून एक आणा न घेतां पत्र परत दिलें. दुसरे दिवशीं त्या शिपायास विचारतां त्याणें सांगितलें कीं ती चूक पुण्याचे पोष्टाची होती सबब त्यास लिहून कळविलें आहे. आतां या संबधानें एक दोन प्रश्न असे निघतात कीं— ( 1 Anna due ) असा छाप मारणें तो नाटपेड पत्रांस ६ माशांवर व पोष्टपेडांसही तोच नियम असेल असें वाटतें. व कांहीं पत्रांचें वजन ६ माशांहून जास्त नसतांही त्यांवर असा छाप दृष्टीस पडूं लागला याचें कारण काय असावें?

२ पाहिजे त्या पोष्टमास्तरची चूक पाहिजे त्या पोष्टमास्तरानें परस्पर त्यास कळवावी कीं काय? अगर वरिष्ठाकडे तरी आशा प्रकारच्या चुका कळवाव्या असें असल्यास एथील पोष्टमास्तराकडून लिहून गेलें कीं नाहीं? गेलें असल्यास तजवीज लवकर होईल हें उघड आहे.

३ ज्या पोस्टांत ( 1 Anna due ) असा छाप मारला जातो त्या छापांत त्या गावचें नाव असणें अति महत्वाचें आहे परंतु तसें दृष्टीस पडत नसल्यामुळें मोठें आश्चर्य वाटतें. तर याबद्दल तिकडील अधिकाऱ्यांची आर्डर कशी आहे तें कळल्यास चांगलें होईल.

वर लिहिलेल्या शिक्यांत गावचें नाव असल्यापासून किती नफे आहेत व नसल्यापासून किती तोटे आहेत वगैरेचें विवेचन करणार होतों परंतु हल्लीं लिहिल्याची काय वाट होते तें पाहून प्रसंगीं कळवीन.

येथील गरीब लायब्ररीस म्यु० कमिटीकडून कांहीं रकम मिळावी हें कमिटीस भूषण आहे. व सार्वजनिक हिताच्या संबंधानें कमिटी विचार करील अशी पूर्ण आशा आहे.

खामगाव—तारीख २६ आक्टोबर सन १८७६ इसवी

एक
पत्र वाचणारा.

## साबूदाणा हें काय आहे?

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. ही वस्तू अलीकडे सर्वांच्या पहाण्यांत आहे. पूर्वींच्या वेळीं ( इंग्रजी नव्हती तेव्हां ) या वस्तूचें नाव देखील कोणास ठाऊक नव्हतें. इच्या उत्पत्ती विषयीं अनेक लोक अनेक तऱ्हेच्या गोष्टी सांगतात. कोणी ह्मणतात हें एका झाडाचे बीज आहे. याजवर दुसरे अशी शंका काढितात कीं जर यास बीज ह्मणावें तर हें लाविलें असतां याचे वृक्ष कां बनत नाहींत ? मिळून याच्या उत्पत्तीविषयीं घोटाळा होऊन खरें काय याचा कांहींच निर्णय होत नाहीं. आमच्या देशांत जे कांहीं धर्मभोळे लोक आहेत, ज्यांस इंग्लिश वस्तू किंवा इंग्लिश रीति यांचा उच्चार केला असतां कोप यावयाचा इतकेंच नव्हे तर तो उच्चार करणारावर ते कडकडून उठावयाचे. अशा लोकांची जीं उपवासाचीं पवित्र [ केळीं, पेरू, शिंगाडे वगैरे ] साधनें त्यांतच ते त्यास गणितात. आतां हें काय आहे याजबद्दल पक्की चौकशी झाल्याच्या अगोदर ही वस्तु इतकी पवित्र होऊन प्रचारांत कशी आली असेल याचा मोठा अचंबा वाटतो. इचे उत्पत्तीबद्दल एक दंतकथा ऐकूं येते तिच्या खऱ्या खोट्याचे निर्णयाकरितां आह्मी ती लोकांपुढें ठेवितों. आणि जर यांत लिहिलेली उत्पत्ती खरी असेल तर धर्माच्या बाबदींत आजपर्यंत याच्या योगानें मोठा घोटाळा झाला असें ह्मटलें पाहिजे, आतां आह्मी लिहिणार आहों ही तरी ऐकत ऐकत आलेली गोष्ट आहे ती अशी:-

एके दिवशीं एक साहेब आणि त्याचा कारकून यांच्या गोष्टी चालत असतां कारकुनास साहेबानें विचारलें कीं आज क्या फराल किया ! [ त्या दिवशीं कारकुनास उपवास होता ] त्याजवर केळीं, पेरू, साबुदाण्याची खीर वगैरेचीं त्यानें नावें घेतलीं. तें ऐकून साहेब फार हसूं लागला, आणि ह्मणाला तुह्मी हिंदू लोक जातीच्या पवित्रतेबद्दल मोठा अभिमान बाळगितां त्यास ही वस्तू खाल्यामुळें तुमच्या जातीस कांहींच कां नाहीं हरकत येत ? हें ऐकून त्या कारकुनानें साहेबास विचारलें कीं हें आहे तरी काय? तेव्हां साहेब ह्मणालें हा साबूदाणा हें कांहीं बीज नाहीं. पाहिजे असल्यास मी तुह्मास आतांच्या आतां तयार करून दाखवितों. कारकून ह्मणाला पाहूं द्या. त्याजवर साहेबानें एका पात्रांत हरभऱ्याचें पीठ आणिलें आणि आपण मोतिचुराच्या कळ्या पाडितों त्या पेक्षांही बारीक अशा कळ्या पाडिल्या. नंतर त्या एका पात्रांत ठेवून त्यांस एका प्रकारचें तेल लाविलें, तेव्हां त्या इतक्या घट्ट झाल्या कीं, त्या दगडानें ठेचिल्या असतांही फुटेनात. पुढें त्या बारीक कळ्यांस एका वाईट तऱ्हेच्या तेलाचें पूट दिलें तेव्हां तें सर्व साबूदाण्याच्या आकारांत आलें. आणखी साहेब ह्मणाला तुह्मीच पहा, जर हें बीज असतें तर याचीं झाडें कां नसती झालीं? आणि ज्या वेळेस हें धुतात, त्यावेळेस ओशट ओशट तुपासारखा तवंग त्याजवर नसतो कां? याजवरून पहा, अशी याच्या उत्पत्तीची चमत्कारिक गोष्ट कळते. पण ती खरी नसावी असें आह्मास वाटतें. तरी हें काय आहे याजबद्दल खुलासा व्हावा ह्मणून आह्मी हें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करीत आहों. करितां याबद्दल आपण अगर आपले वाचक निर्णय देतील अशी आशा आहे. कळावें तारीख १ माहे नोवेंबर सन १८७६ इसवी.

एक
शंकित.

वऱ्हाडसमाचार

मिति कार्तिक वद्य ९ शके १७९८

Mr. Laksmipati Naiudu Barrister at Law delivered a lecture on the qualifications & duties of a vakeel on the 17 th ultimo in the Town Hall, Akola. There was a large gathering of native gentlemen on the occasion.

Rawesaheb Narayen Bhai Dandekar was called to the chair by the unanimous vote of the gentle men assembled. In the opening speech the chairman acknowledged, with thanks, the benefits which Akola is likely to enjoy from the permanent stay of the Barrister at this place. He then communicated, in short, the views which our learned Naiudu intends to promote. Mr. Laksmipati, then spoke on the subject of the evening to the following effect.

Chairman and Gentle—men, the subject that I have chosen to speak upon, is one that will contribute highly to the improvement of our country. Before entering into the subject, however, let me tell you, that I intend to open a Law-class to prepare students for various Law Examinations & to enable them to qualify themselves for places of great importance.

At the beginning Law will appear to you, an insipid and uninviting subject. But when you once get into the heart of it you will find that there is no other branch of study that is so interesting. Law is a labyrinth the windings of which, it is imposible to trace in a short time. But if you persevere you will, in the long run, master it.

The student that aspires to acquire a competent knowledge of law must be thoroughly conversant with many of the higher branches of study. He must know Logic and mathematics. Only a smattering knowledge of these subjects will be of no use. Law is full of arguments, and therefore every kind of knowledge that contributes to call forth and expand the reasoning power, is of vital importance to the student of Law. If you intend to follow the profession of a Vakeel you must pursue a course that will convince the people that you are able to advocate the cause of your client to the satisfaction of the Judge.

From what I have said you will perhaps think that I like to encourage litigation. I am far from such a thought. We are compelled to have recourse to litigation. It is therefore indispensably necessary that we must learn Law thoroughly.

I must tell you how you should proceed in studying Law. You must first learn jurisprudence, which is the foundation of the superstructure which you have to build. You must then learn successively the Laws of Evidence Torts &c., and last of all the laws relating to our own country. Our laws have undergone great changes. They are not handed down to our courts in their original form. They have sufferd much from the ignorance & incapacity of those that have translated them. The translations that have been made, have only served to misguide the Lords of the Judicial Committee. This is one of the reasons why we should learn our laws thoroughly and should be able to point out mistakes in the former decisions.

Those who have recourse to you come to you with a strong hope that they will be relieved from their distressed condition. They are indeed in a very hopeless condition and come to you to seek that relief which you are bound in duty, to secure for them. They divulge to you those secrets which they will not communicate to any one else. When they do so some of you think that they speak nonsense. But you do not give proper consideratation to the circumstances of the case. Place yourself in the position of your client and you will come to know what the truth is. You must, therefore do your best, to promote, the interest of your client. You must always be honest & pains taking and must never fail to do your duty. If you do not do your duty you lower yourself in the eyes of the Judge, in the eyes of your countrymen and above all in the eyes of your Maker. You must, moreover, bear in mind that you have taken oath to act honestly and to protect the interests of your client. You must not try, even for any possible advantage to mislead him. Sometimes you will be tempted to humour the Judge. But this is no good man's conduct. To us it is that liberty of speech is allowed. But we ought not to abuse it. We ought not to carry the independence too far. We must know that Judges are possessed of learning; that their experience entends over a series of years; & that as posts of so much importanee have been entrusted to them, they are endowed with more then average ability. I do not mean to say that judges are not at all liable to err. As men, they must commit errors. But when you see that they differ from you, you must not think that what you say is always true. On the other hand I know some persons who, when they see that the judge dose not like what they say, do not speak. But you ought to bear in mind that so long as there is nothing but justice in your arguments the Judge cannot say "sit down." It is needless to say that the magistiate also must be possessed ofl earning, integrity and good sense. That there are judges, who do not possess any of these qualities, and that such judges will not like your straightforward conduct is undeniable, but as honest men you ought never to swerve from the path of rectitude, which is the only way to the real interest of yourself and of your country. You ought to consider that a great responsibility hangs over you. If the learned portion of the community do not render to their countrymen, every assistance which lies in their power, they are guilty of a dereliction of the highest trust.

There is one more point that stands in need of a special remark. You are some times called on by some wicked men to be an instrument of reaking vengeance on their enemies. Never consent to be subservient to such views. Tell the person that comes to seek your assistance to promote such an end, that you have not studied law to ruin others, that you will not abuse law, and that he should seek such aid elsewhere

There are Vakeels who always seek to expose the shortcomings and defects of others of their profession. They always try to run others down. This sort of conduct is ungentlemanly. The profession of law is honourable. The wretch that brings dishonor to this profession by a course of conduct, not befitting a gentleman, stands accursed in the eyes of the learned and in the eyes of his contrymen.

Our kind rulers have opened to us various ways, by which we can honestly and comfortably obtain our living. The time is drawing nigh when places of the highest importance will be entrusted to us. At such a time it is essentially necessary that we should, by our moral, intellecual & practical abilities show that we are fit to occupy such places. We have already begun to see instanses of this high favour at the hand of our rulers. This Berar, itself has, of late, received, as attaches, men that have passed successfuly, through university Examinations. Such instances will be, by the grace of Almighty, multiplied in course of time. We must hope that the day will soon come.

---

## दुष्काळ आणि दरबार किंवा सुखदुःखाचें मिश्रण!

मुंबई इलाख्यांत ९ जिल्ह्यांत दुष्काळ आहे, मद्रास इलाख्यांतही ७।८ जिल्ह्यांत दुष्काळ आहे, निजाम सरकारचे राज्यांतील मोठे प्रदेशांत दुष्काळ आहे; सांगली, मिरज, जमखंडी संस्थानांतून दुष्काळ आहे, हजारो लोक अन्नावाचून उपास काढीत आहेत, गाई, बैल, ह्मशी यांचें तर बहुतेक देहावसान झालें, गांवचेगांव ओस पडले. तान्हीं पारठीं बालकें डोकी खांद्यावर घेऊन सुकुमार अबला स्त्रिया पतीसहित अन्नाचे शोधार्थ देशो धडीस लागल्या, जन्मांत ज्यांस कधीं मजूर कामाचा संस्कार नाहीं अशीं प्रतिष्ठित ब्राह्मण घराणीं भिक्षुक, वैदिक, याज्ञिक, सराफ, छोटे व्यापारी, व इतर गृहस्थ उपाशी न मरावें ह्मणून खोरीं कुदळीं हातीं घेऊन रिलीफ फंडाकडे कामें करूं लागले तथापि त्यांची बायका मुलें उपाशीं मरत आहेत त्यांची तजवीज काय? त्यांनीं भिक्षा ही मागितल्यास घालणारा तरी कोणी नियत आहे काय? अहाहा! परमेश्वरा, काय ही विपत्ति!

ही दक्षिण हिंदुस्थानची गोष्ट झाली आतां उत्तर हिंदुस्थानांत दिल्ली दरबाराकडे पहा! हिंदुस्थान सरकार लाखो रुपये खर्चून थाट माटाचा व डाम डौलाचा दरबार करणार. शेकडो राजे रजवाड्यांस ही लाखो रुपये लवाजम्यास व नटण्या मुरडण्यास खर्च होणार. भरगच्ची पोशाक, जवाहीर, हत्ती घोडे, पालख्या यांची सजवणूक होणार, तंबू, डेरे, राहुट्या, यांचीलई लूट होणार, तोफांचे गडगडाट व वाद्यांचे आवाज येणेंकरून दिल्ली शहर दुमदुमून जाणार. गवरनर, ले० गवरनर, कौन्सलर, कम्यांडर, वगैरे मोठमोठाले मुत्सद्दी युरोपियन सहस्त्रावधि जमणार. उत्तमोत्तम खाद्य पदार्थांच्या पर्वतप्राय राशी पडणार, व पेय द्रव्याचें एकादें सरोवर भरेल अशीं पिंपेच्या पिंपे खलास होवाल, गीत, नृत्य, नाटकें, व इतर खेळ यांची रेलचेल उडणार, सारांश तेथें जमणाऱ्या लाखपन्नास हजार लोकांस दिवस रात्र आनंद, संतोष, मौज, उल्हास व प्रसन्नता यांच्या अनुभवानें कुबेरपुरींतील अविनाशी स्वर्ग सुखाचाच आपण उपभोग घेत आहो असें वाटावें असा दरबार भरविणारांचा उद्देश आहे. ही किति उत्तम गोष्ट आहे!

अहाहा! आतां या दोन्ही गोष्टी एकत्र करून पहा! दोन्ही भाग मिळून हा हिंदुस्थानदेश एकच नव्हे का? मग त्याच्या एका भागास आनंद व दुसऱ्याभागास दुःख असें कां होऊं द्यावें? एकाच तोंडांत उजवीकडून फणसाचा गरा आणि डावीकडून कडू वृंदावन का घालावें? एका हातास सुवर्ण भूषणांचा शृंगार. व दुसऱ्यास विजेचें यंत्र लावल्याप्रमाणें वेदना कां द्याव्या? एकापायास तूप लावून चोळीत बसावें व दुसरा विस्तवांत भाजत आहे त्याविषयीं निष्काळजी राहावें, त्याचप्रमाणें अशा विपत्तीच्या प्रसंगीं दरबारचा थाटमाट फार अप्रजयोक दिसणार आहे; सबब तो एकदम बंद करावा असें आह्मांस वाटतें, व परमेश्वर आमच्या या ह्मणण्यास आशींवाद देवो.

---

### आर्यजननीचा विलाप.

आह्मी चौघी बहिणी आहो. आमच्या बापानें आमचीं लग्नें करते वेळीं चौघीस ही उत्तम स्थळें पाहून दिलीं. परंतु नशीब कोणाच्या हातीं असतें का? थोड्याच काळांत. त्या तिघींची अगदी दैन्यावस्था होऊन त्या तिघीही माझा दुस्वसा करूं लागल्या. त्यांतून जी सर्वांत धाकटी तिच्या गुणावरून आमच्या बापानें तिचें नांव मत्सरी असें ठेविलें. ती माझा फारच द्वेष करूं लागली. वास्तवीक ह्मटलें ह्मणजे प्रत्येकास आपापल्या नशिबाप्रमाणे स्थिति प्राप्त झाली. तेव्हां कोणी कोणासच दोष देण्याचें कारण नव्हतें. पण अशी सद्बुद्धि तीस कोठून सुचणार. जरी मनापासून ती माझा द्वेष करी. तरी बाह्यात्कारी तिणें अगदीं मायेचें सोंग आणलें होतें. तिणें मला एक दिवस पत्र लिहिलें न ताई माझीं मुलें मोठीं झालीं आहेत आणि आमच्या देशांत विद्या, कला, कौशल्य हें नाहींत यामुळें मुलें फुकट चाललीं आहेत तरी तूं आपले घरीं यांस घेऊन जा. मी आपली भोळी, तिचा कावेबाजपणा माझे लक्षांत कसचा येणार? मी बरें आहे ह्मणून तिचीं मुलें घरीं आणलीं पण अगदीं फसले हो. मीं त्यांस पोटच्या पोरांपेक्षां जास्ती रीतीनें वागविलें, मागतील ते जिन्नस दिले, नाना प्रकारें कोड पुरविले तें सर्व व्यर्थ होऊन हल्लींच्या भीकमाग्या स्थितीला येण्यास मी योग्य झालें. आज काय! आठवड्याचा बाजार आला. मावशी आह्माला गडे खाऊ पाहिजे. आज काय कपडे पाहिजेत. आज काय चांगल्या चांगल्या वस्तू खेळायाला पाहिजेत. अशा करितां हजारो पैसे म्यां खर्च केले. पण पुढें पहाते तों त्यांची वर्तणूक तऱ्हेवाईक दिसली. माझ्या जवळून पैसा घेऊन कांहीं वस्तू आणण्याचें मिष करून जात मात्र, पण तो खर्च न करितां आपल्या आईकडे पाठवीत. मावशीग, आह्मांस राज्यकारभाराची अगदीं माहिती नाहीं. कांहीं दिवस पर्यंत आह्मी काम करितों. त्याची आह्मांस चांगली माहिती झाली [illegible] मग आह्मी आपल्या दादा जवळ [illegible] देऊ, तेंही ह्मणणें म्या कबूल केलें. इतकेंच ह्मणालें मुलानों! गुण्या गोविंदानें सर्व जण असा भांडू नका. पुढें एक एक नव्या नव्या कांगाळ्या येऊं लागल्या. व माझ्याच मुलांस ते वाईट रीतीनें वागवूं लागले व त्रास देऊं लागेल. मी ह्मणाले मुलांच्या खटल्यांत आपण कशाला पडावें. तिची आणि माझी लेकरें कांहीं निराळीं नाहींत. अल्लड आहेत. मोठीं झालीं ह्मणजे होतील शहाणीं. अशा भरंवशावर राहून उलटी माझ्याच मुलां पैकीं जर कोणी त्यांच्याविषयीं कांगाळी आणिली तर त्यांसच मी शिक्षा देत असे. पण ही

माझी त्यावेळची वर्तणूक माझ्या पश्चात्तापाला कारण झाली आहे. त्यांनीं सारी सत्ता आतां आपल्या हातीं ठेविली त्याहे ते आपली पूर्वींची स्थिति अगदीं विसरून गेले आहेत. त्यांच्याजवळ लाडामुळें जो मी च्यार दिवस कारभार दिला त्याचा परिणाम कसा झाला पहा: मलाच आतां त्यांच्या मुठींत रहावें लागत आहे. देतील तेवढें खावें, पी ह्मटल्यास प्यावें, असें मला झालें आहे. हा सर्व परिणाम फक्त भोळेपणाचा व बहिणीवर जी माझी ममता होती तिचा. मला जर पहिल्यापासून यांची अशी अपमतलबी वर्तणूक ठाऊक असती तर मी त्यांस आपल्या घरीं आणिते कशाला, आणित्या बहिणीवर इतका लोभ करिते कशाला? इतक्यादिवस जें त्यांनीं आपलें घर भरलें त्याचा मला फारसा विचार वाटला नाहीं. मी ह्मटलें, आहे पुष्कळ संपत्ती, किती नेतील. पण हीं हुशार नुसतें द्रव्यच नेऊन रहावयाचीं नाहींत. तर सुद्धां नेणार. जर यांचें राहणें मुदतीचें असतें तर इतक्यालाही मी त्रासले नसते पण मुदत कशाची? सदोदित हें असेंच चावणार. मुलांनो आतां मी अगदीं सत्वहीन झालें आहे. वार्धक्यामुळें माझ्यांत अगदीं त्राण राहिलें नाहीं. करितां तुह्मा सर्वांस कळवितें कीं तुह्मी आपली खरी स्थिति आपल्या मावशीच्या कानावर घाला. ती दयाळु आहे. ती आपल्या मुलांत आणि तुमच्यांत अंतर ठेवणार नाहीं. त्यांस जे हक्क आहेत ते ती तुह्मांस देईल. मात्र सर्व हवाल कळविण्यास आळस करूं नका.

## हिंदुस्थानांतील कित्येक संस्थानीकांची माहिती.

| नाव व हुद्दा | संस्थान | चौरस मैल | लोकसंख्या | वसूल रुपये. |
|---|---|---|---|---|
| महाराणा सरज्यानसिंग | मेवाड उदेपुर | ११६१४ | ११६१४०० | ४० लक्ष |
| महाराजा | मारवाड जोतपुर | ३५६७२ | १७८३६७० | १७५०००० |
| महाराजा रामसिंग | जयपुर | १५ हजार | १९ लक्ष | ४२३१६५० |
| महाराव चतरसिंग | कोटा | ५ हजार | ४३३००० | २५ लक्ष |
| महाराजा | करावली | १८७८ | १८८००० | ४॥ लक्ष |
| महाराव | बुंदी | २२९१ | २२०००० | ५ लक्ष |
| महारावल सरदारसिंग | बिकानीयर | १२२५२ | ७३७०० | ५ लक्ष |
| महाराजे जसवंतसिंग | भरतपुर | १९७४ | ६॥ लक्ष | २४लक्ष २०ह. |
| महारावल बहिरीलाल | जसलमीर | १२२५५ | ७३७०० | ५ लक्ष |
| राणा | धोलपुर | १६२६ | ५ हजार | ६ लक्ष |
| महाराव राजा मंगलसिंग | अलवार | ३३०० | १० लक्ष | २०५०००० |
| रावल उदाईसिंग | डोंगरपुर | १ हजार | १ लक्ष | ७५ हजार |
| रावल लक्ष्मणसिंग | बलसवारा | १५०० | १५०००० | ३ लक्ष |
| दिवाण दलपतसिंग | प्रतापगड | १४६० | १५०००९ | २६२४०० |
| राव उमेदसिंग | सिरोही | ३ हजार | ५५ हजार | ८० हजार |
| महाराज राणा प्रभुसिंग | झालावर | २५०० | २२०००० | १४१०००० |
| राजा प्रभुसिंग | लाखनगड | ७२० | ७० हजार | ६ लक्ष |
| जनाब इब्राहीम अलीखान | टांक | १८०० | १८२००० | ८ लक्ष |
| महाराज जयाजीराव शिंदे | ग्वालेर | ३३ हजार | २५ लक्ष | ९५ लक्ष |
| महाराजे तुकोजीराव होळकर | इंदूर | ८३१८ | ५७६००० | ४० लक्ष |
| बेगम शाहाज्याहान | भूपाळ | ६७६४ | ६६३६५६ | १४ लक्ष |
| महाराजा रघुनाथसिंग | रेवा | १२७२३ | १२८०००० | २२॥ लक्ष |
| राजे आनंदराव पवार | धार | २६९१ | ।। लक्ष | ४४०००० |
| राजे कृष्णराव व नारायणराव पवार | देवास | २५६ | २५ हजार | ४२०००० |
| नबाब इस्मायलखान | जावरा | ८७२ | ८५४५३ | ६६०००० |
| राजे रणजीतसिंग | रतलाम | ५०० | ९५ हजार | ६ लक्ष |
| राजे हमीरसिंग | अडच्या | २१६० | २ लक्ष | ५५०००० |
| राजे भवानीसिंग | दतिया | ८५० | १२०००० | १० लक्ष |
| राजे नरपतसिंग | पन्हा | ६८८ | ६७५०० | ४ लक्ष |
| राजे जयसिंगदेव | चिरकारी | ८८० | ८१हजार | ५ लक्ष |
| राजे | चतरपुर | १२४० | १२०००० | ३ लक्ष |
| गायकवाड सयाजीराव | वडोदा | ४३९९ | १७१०४०० | ६० लक्ष |
| राजे शिवाजी छत्रपती | कोलापुर | ३१८४ | ५४६१५६ | १० लक्ष |
| राजे रघनाथ सावत भोसले | सावतवाडी | ९ शें | १५२५०६ | २ लक्ष |
| महाराजे राव | कच्छ | ६॥हजार | ४०९५२२ | १४लक्ष |
| महाराज केशरसिंग | इडा | | २१७३८२ | ६लक्ष |
| ठाकूर | भोनागड | | ४९३५४ | ८लक्ष |
| नबाब अली मुरादखा | खैरपुर | ६हजार | १०५००० | ४६०००० |
| नबाब मुरबतखा | जुनागड | | ३८०९१० | २० लक्ष |
| निजाम उलमुलुख | हैदराबाद | ९५३३७ | १०५००००० | २कोटि |
| महाराजे चामराजेंद्र | ह्मैसूर | २७००४ | ५० लक्ष | १कोटि |
| राजा रामवर्म | त्रावणकोर | ६६५३ | १२६२६४७ | ५० लक्ष |
| मुटाटचरणरावचर्म | कोचीन | ११३१ | ३९९०६० | १०लक्ष |
| महाराजा रागवीरसिंग | काश्मीर | २॥हजार | १५ लक्ष | ८० लक्ष |
| महाराजा | पतियाळा | ५४१२ | १५८६००० | ४० लक्ष |
| नबाब सादिकमहमदखा | भावलपुर | १४४८३ | ३६५००० | २०लक्ष |
| राजा संगतसिंग | झिंद | १२३६ | ३११००० | ४ लक्ष |
| राजे भावलसिंग | नभा | ८६३ | २७६००० | ६॥लक्ष |
| राजा विक्रमसिंग | फरिदाबाद | ६४३ | ५१हजार | ३ लक्ष |
| नबाबअली सर्फअलीखा | रामपुर | ११४० | ३९०००० | १०लक्ष |

## वऱ्हाड.

सिकंदराबादेकडील पत्रावरून समजतें कीं तिकडे दुष्काळाचा अंमल बसून व्यवहार निकृष्ट स्थितीस चालला आहे. तांदूळ ९ रुपये पल्ला होते ते ३० रुपयांनीं झाले. जोंधळे ५॥ रुपयांनीं होते ते १५ रुपयांनीं पल्ला झाले. व असेच सर्व जिन्नस महाग झाले. या गुरूवारच्या मागील गुरूवारीं ज्या लोकांची अन्नान्नदशा आहे त्यांनीं बाजार लुटले. तेव्हापासून लश्करची ग्याटें बाजारांत जागोजागीं ठेविलीं आहेत. आतांच ही दशा मग सरसाल कसें जाणार तें कळत नाहीं. विहिरी बहुतेक अटत चालल्या, तशींच तळीं व सरोवरें यांची दशा होऊं लागली आहे. मुलखांत दुष्काळग्रस्त लोकांस मदत करण्यास सरकारानें लाखोरुपयांचीं नवीं नवीं कामे काढिलीं आहेत.

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर यांची प्रकृति अजून बरी झाली नाहीं ह्मणून ते हैदराबादेस जातील किंवा नाहीं याविषयीं संशय आहे.

कर्नल अलार्डाईस साहेब जुडिशियल कमिशनर या आठवड्यांत येथें येऊन पुन्हा काल उमरावतीस गेले. त्याना हैदराबादेस जावयाचें आहे. पोलिटिकल आफिसर लोकांची तेथे ९ने तारखेस परीक्षा आहे व तींत उभयतां कमिशनर साहेब परीक्षक आहेत.

बुधवारीं सेशन भरलें होते त्यांत कैदी बाबुला धनगर यावर आरोप शाबिद होऊन त्यास जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली.

हैदराबादेहून आह्मांस पत्र आल्यावरून समजतें कीं, जुडिशियल कमिशनर साहेबाचा दिल्लीचे दरबारास जाण्याचा विचार नाहीं व तसें त्यांनीं हैदराबादेस कळविलें आहे त्यावरून रेसिडेंट साहेबानीं ठरविलें कीं कर्नल नेंभार्ड साहेब दिल्लीस गेल्या मागे जुडिशियल कमिशनर साहेबांनीं दोन्ही आफिसांचीं कामें पहावीं.

इलिचपुरचे जुडिशियल शिरस्तेदार रा. रा. रामराव हणमंत मरण पावले. त्यांचे जागेवर कोणाची नेमणूक होते पहावें.

रा. रा. गणपतराव श्रीकृष्ण खापरडे याचें उदईक सायंसाळीं एथें व्याख्यान होणार आहे.

मि. मोलवी जबरुदीन हिंदुस्थांनी शाळावरील डिपुटी इन्स्पेक्टर यांस काल ज्याचा आजार झाला होता पण ईश्वर कृपेनें आरोग्य झालें.

उमरावतीचे डिपुटी कमिशनर क्या. बुलक साहेब यानीं आणखी ११ दिवस आपली रजा वाढविली आहे.

उमरावतीस मुसलमान लोकांची सभा होऊन तुर्कस्थानास मदत करण्या करितां ७०० रुपये जमलें.

परीक्षेचीहकीकत—उमरावतीस गेल्या आठवड्यांत परीक्षा झाल्या त्यांत उमेदवार होते ते:—

हायरस्न्यांडर्ड.

१ मि० हेर साहेब असि० कमिशनर

२ मि० किटस साहेब असि० कमि०

३ नबाब महमद शाबुदीन सा. अ. क.

४ अबदुल हक्क सा० एक० अ० क०

५ रा. रा. केशव जयकृष्ण क्लार्क

लोअरस्न्यांडर्ड.

१ मि० अबदुल रहिमानखा तहशि०

२ मि० सादतमीरखा तहशिलदार

३ मि० शाबासखां तहशिलदार

४ रा. रा. शंकर रामचंद्र क्लार्क

यांत वरीलपैकी तिसरे व खालील दुसरे गृहस्थ शिवाय करून सर्व जण पास झाले असें ऐकण्यांत आहे, आमचे मित्र अबदुलहक्क साहेब हायरस्न्यांडर्डकरितां यावर्षीं पहिल्यानेंच गेले असतां एक दम पास झाले. लोअरप्रमाणें रेंगाळले नाहींत यावरून त्यांनीं कायद्याकानूंत चांगलें चित्त पुरविलें असें स्पष्ट दिसून येतें व याबद्दल आह्मांस संतोष वाटतो. हे तरूण असून बुध्धिमान आहेत, चलाख आहेत, व खानदानींतील असून साहेबलोकांत मिसळून राहणोर आहेत आणि त्यांची हुशारी व कायद्याकानूचें ज्ञान परीक्षेत कसोटीस लागलें आहे तेव्हां प्रसंग येतांच एकादे असिस्टंट कमिशनरची जागा त्यांस मिळण्याचा संभव आहे व त्याप्रमाणें मिळावी अशी आमची इच्छा आहे. कारण ते आतां अनुभवानें बरेच मुरत चालले आहेत.

मि० शाबाखा मंगरूळचे तहशिलदार हे नवीनच कामावर आलेले असून पहिलेच परीक्षेत पास झाले हीही त्यांस भूषणास्पद गोष्ट आहे.

हैदराबादेकडील खबरेचें रायचुराहून पत्र प्रसिद्ध झालें आहे त्यांत दुष्काळाच्या तडाक्यानें पुष्कळ लोक उपाशी मरत आहेत असें लिहिलें आहे व तशा बैतागलेल्या लोकांनीं यादगिरी गावाजवळ धान्याच्या व्यागन्स भरून ट्रेन चालली असतां ती अडखळून पडावी ह्मणून एक मोठा धोंडा रेलावर ठेविला होता पण त्या विषयीं चौकशी कोणी केली नाहीं असें ही त्या पत्रांत लिहिलें आहे.

दुसऱ्या एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं मोगलाईंत बहुतेक जागीं दुष्काळ आहे याज करितां निजाम सरकार दर वाढ न जातील तर चांगलें.

## परिक्षेतील प्रश्न

### फौजदारी.

१ गुन्ह्याची चौकशी करण्याचे संबंधानें व त्याबद्दल शिक्षा ( त्यांत कैद, दंड व फटके यांचा समावेश होतो ) देण्याचे संबंधानें कोणते माजिस्त्रेटात कसकसे अधिकार आहेत ते लिहा.

२ दुसरा अगर तिसरा वर्ग माजिस्त्रेट यांना आरोपी गुन्हेगार आहे असें वाटतें. परंतु आपल्यास अधिकार आहे त्या पेक्षां जास्त शिक्षा मिळावी हें वाजवी आहे असें दिसेल तर त्यांनीं काय करावें.

३ गुन्ह्याची चौकशी कोणते ठिकाणीं करावी.

४ पोलिसास वारंटावाचून केव्हां पकडतां येतें.

५ समन्स खटल्याची चौकशी माजिस्त्रेटानें कशी करावी तें लिहा.

६ ज्या गुन्ह्यास कैदेची शिक्षा सांगितली आहे व ज्या गुन्ह्यास फक्त दंडाची

शिक्षा सांगितली आहे अशा प्रकारच्या गुन्ह्यास दंड न दिल्यास किती शिक्षा द्यावी याबद्दल काय नियम आहेत;

७ एखाद्या मनुष्यानें दारूच्या अमलांत गुन्हा केला असतां तो शिक्षेस पात्र होतो किंवा नाहीं?

८ सहाय्य करणें ह्मणजे काय?

९ अन्यायाची आगळीक ह्मणजे काय

१० जबरीची चोरी व दरवडा ह्मणजे काय?

१ रेकग्नाइझ्ड एजंट (कुलमुखत्यारी) ह्मणजे काय ?

२ दिवाणी कोर्टांत कोणास येण्याची माफी आहे काय?

३ फिर्याद अर्जीत कोण कोणत्या गोष्टी पाहिजेत?

४ कोणकोणत्या कारणामुळें दिवाणी कोर्टास फिर्याद नामंजूर करण्याचा अधिकार आहे !

५ जमीनीसंबंधीं दावा असून कांहीं जमीन अगर मालमत्ता एका कोर्टाचे हद्दींत आहे व कांहीं दुसऱ्या कोर्टाच्या हद्दींत आहे तर कसें करावें?

६ कोर्टांत हजर नाहींत अशा लोकांना दाव्यांत पक्षकार करणें झाल्यास काय केलें पाहिजे.

७ प्रतिवादीस अव्वल कैद करता येतें काय?

८ कोणत्या वेळेस झालेला करार निरर्थक होऊ शकतो.

९ अनिवार्य कारणामुळें एकादा दस्तैवज नोंदण्याकरितां योग्य मुदतींत हजर केला नाहीं तर काय परिणाम होईल?

१० प्रतिवादीवर समन्स कसें बजावावें! तो जर न सांपडेल तर काय करावें ?

## नोटिसा

मातादीन वल्लद रामप्रसाद रहाणार मूर्तिजापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मीं वऱ्हाडसमाचारांतून जी नोटिस दिली ती पोहोचली. नोटिशींत तुह्मी लिहिलेला मजकूर एकही खरा नाहीं. तुह्मी रामचंद्राचे देऊळाचा मक्ता घेऊन आह्मास करारनामा एक रुपयाचे कागदावर लिहून दिला त्याजवर तुमची सही व साक्ष आहे त्याप्रमाणें एकही करार पुरा न करितां त्या करारनाम्याचे विरुद्ध नोटिसींत मजकूर लिहिला. तुह्मी जें काम दिवाल व गच्चीचें केलें तें एकही उपयोगाचें व शर्तीप्रमाणें नसून आह्मास दुबारा त्याजला दुरुस्त करणें भाग आलें. करारनाम्यांत लिहून दिलेली एकही शर्त पुरी केली नसून विनाकारण रुपये खाऊन बसले व पूर्वेचे दिवालींत कमाना करण्याचा करार असतां ते न करितां गेले. त्याजला आह्मी दुसरा राजचवदा आणे रोजाचा लाऊन काम सुरू केलें व वरची गच्ची व मुंढारी दुरुस्त करणें आहे त्याजलाही रुपये पाहिजेत एकंदर तमाम तयार झाल्यावर कमानास, गच्चीस व मुंढारीस जो पैसा लागेल तो तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून या नोटिसीच्या खर्चासुद्धां घेण्यांत येईल. कळावें तारीख १० माहे अक्टोबर सन १८७६ इसवी.

(सही) घासीराम गुलाबराय परदेशी
दस्तुर वामनरामचंद्र कुलमुखत्यार रहाणार मूर्तिजापुर

### नोटिस.

उमी मर्द एको लोहार वस्ती कसबे अडगाव तालुके अकोट इजकडून गुणाजी वल्लद सखारामजी लोहार वस्ती अकोट तालुके मजकूर याजकडून कळविण्यांत येतें कीं तूं कसबे अकोट एथें तुझे बापाचे घरीं नामे हिरामन लोहार याचे एथें राहून तूं खुशीनें पाट लावण्याचा नेम केला आणि शपत मसी केली कीं मजला सोडून इतर पुरुष जातींत सर्व बापासमान ह्मणोन मजला तुझा भरवसा आल्यावरून मी तुझे बापाचे घरीं पोटखर्चासुद्धां दिपवाळीचेखर्चासुद्धां एकंदर खर्च पुरविला आणि माझे रुपये तुझे ह्मणण्याप्रमाणें खर्चाकरितां मी देत गेलों शिवाय नगदी रुपये १२ तुजपाशीं-ठेविले याशिवाय माझा भाऊ नामे भवानी याजपासून तूं रुपये ११ अकरा घेतले आणि त्याजला असें सांगितलें कीं दंढवाळी माझी गाहण मारवाड्याचे घरीं आहे ती सोडून आणतो ते रुपये व तुझ्याकरितां डागिने मी तुझे ह्मणण्याप्रमाणें करविले त्याजबद्दल खर्च, सोयरिकीबद्दल अन्न खर्च व पाटाकरितां अन्न खर्च वगैरे तयार केला मिळून एकंदर सुमार दोन शे रुपये लागले आहेत. नोटिस देण्याचें कारण कीं तूं आतां अडगावास पुरणा लोहार याचे घरीं जाऊन बसली आहेस तुझा पाहिला नवरा मरून सात वर्षें झालीं माझा दिवस पाट लावण्याचा टळला, पाट लावण्याचे नेमांत बरें झालें कीं मी एकटाच नव्हतो सबब नोटिसीनें कळविलें आहे त्यास आजपासून आठ दिवसाचे आंत समर्पक उत्तर द्यावें पंचाचा नेम तुझे बापाचे व आईचे संमतीने झाला आहे. कळावें तारीख२९ माहे आक्टोबर सन १८७६ इसवी.

(सही) गुणाजी वल्लद सखाराम
जी लोहार निशाणी
खुद्द हातची.


## READY FOR SALE

the

CODE OF CIVIL PROCEDURE.

Being

Acts VIII of 1859 and XXIII of 1861, with decisions Contained in the Bombay High Court and the Indian Law Reports, from 1862 to the end of August 1876. Price Rs. 2—8, if paid before the 1st October next, and Rs. 3 afterwards. For outsiders annas 4 in addition for postage. Books sold will bear the signature of either of the undersigned. Apply to

Gungaihur V. Limaye
Pleader, Shunwar Peit.
Pandurang Bachajee
Pleadar, near Panjarpole.

Poona
1st Sept. 1876

N. B. A. Digest of cases on Hindoo and Mahomedan Laws and the Indian Succession Act, is under preparation.



## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

खामगाव तारीख १४ माहे सप्तंबर सन १८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent


## नोटिस
## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावें कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर (उतारकरू) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास ..................... १ रुपया
नेटिव लोक .... ............... ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

## जाहिरात.

उमरावती वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून देण्यांत येते कीं, येत्या दिसेंबर महिन्याचे २५वे तारखेपासून या मंडळीचा पुढें लिहिलेल्या विषयांत उमेदवारांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ सुरू होणार आहे. याजकरितां ज्या उमेदवारांची परिक्षेस येण्याची इच्छा असेल त्यांनीं लेखी अर्ज खालीं सही करणाराकडे प्रमोदसिंधु छापखान्याचे पत्त्यावर सदर्हू तारखे पूर्वी निदान १५ दिवस पोंचतील असे पाठवावे.

"विषय पाहिला— येत्या १८७७ जानेवारी महिन्यांत दिल्ली एथें महाराणीनें एम्प्रेस (बादशाहीण) हा किताब घेतला ह्मणून त्यांचे सन्मानार्थ दरबार भरणार आहे तें वेळेस राणीचे तिसरे चिरंजीव ड्यूक आफ् कानाट हे आले आहेत असें समजून ह्या देशाचें राज्य राणीनें आपले हातीं घेतल्यापासून ह्या देशाचें जें जें कल्याण झालें त्याचें संक्षेपानें यथार्थ वर्णन करून हल्लीं जीं आपलीं दुःखें आहेत तीं दूर करण्यासाठीं ड्यूक यांणीं राणी साहेबांची विनवणी करण्याबद्दल सूचना करणें."

विषय दुसरा— अमुक जातीचे लोकांनीं अमुकच धंदा करावा, दुसरा करूं नये असा आपले देशांत प्रतिबंध असल्यामुळें आपले देशांत तोटे झालेले आहेत त्यांचें वर्णन करून आज कोणत्याही जातीस कोणतेही प्रकारचें शिल्प काम करण्याची इच्छा झाल्यास त्यास प्रतिबंध नाहीं. असें स्थापितें करण्यासाठीं सुयुक्तिक साधारण उपदेशपर भाषण करणें.

विषय तिसरा— औरंगजेब बादशहानें शिवाजी राजावर राजा जयसिंग आणि दिलीपखा या दोघांस स्वारी करण्यास पाठविलें त्या वेळचे मराठ्यांचे आणि मुसलमानांचे स्थितीचें थोडक्यांत वर्णन करून त्या बरोबर लढाई करण्यासाठीं शिवाजीचा सेनाधिपती असें बोलणारानें आपण समजून शिवाजीच्या सरदारास. आणि सैन्यास आवेश व धैर्य येई अशा रीतीनें उद्देशून संभाषण करणें.

येणेंप्रमाणें ३ विषय नेमिले आहेत त्याप्रमाणें पहिल्या विषयांत पहिलें बक्षीस ३० रुपयांचें व दुसरें १० रुपयांचें. दुसरे विषयांत बक्षीस २५ रुपयांचें व तिसरे विषयात २० रुपयांचें याप्रमाणें ४ बक्षिसें दिलीं जातील.

परिक्षेस येणारे उमेदवारांनीं समारंभाचे पूर्वीचे दिवशीं चिटणिसांस भेटावें.

उमेदवारांस लागू असण्याचे नियम खालीं दिले आहेत त्यांकडे त्यांनीं अवश्य लक्ष द्यावें.

१ उमेदवारानें उभें राहून भाषण करावें. व जवळ लेखी टिपण बोलतेवेळीं ठेवूं नये.

२ प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूं नये. परंतु जरूर वाटल्यास भाषण करणारास अर्ध्या तासापूर्वीं रजा देण्याचा व वाटल्यास मुदत अधिक एक तास पर्यंत वाढविण्याचा अधिकार परिक्षकांस आहे.

३ ज्या उमेदवारांचे निरनिराळे विषयांत अधिक गुण लागतील त्या उमेदवारास पहिलें इनाम व [illegible] खालोखाल ज्याचे लागतील त्यास दुसरें इनाम दिलें जाईल परंतु एक तृतियांशापेक्षां कमी लागल्यास मुळींच इनाम दिलें जाणार नाहीं.

४ सन्मानार्थ नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर कोणाची भाषण करण्याची इच्छा असल्यास त्यास परवानगी आहे. उमरावती तारीख ९ आक्टोबर सन १८७६ इसवी.

यशवंत गोविंद सातारकर
सभेचे चिटणीस.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १०   अकोला. रविवार ता० १२ माहे नोवेंबर सन १८७६ इ०   अंक ४५

**विनंती**— या आठवड्यांत कारखान्यांतील निमे कंपाझिटर आजारी असल्यामुळें सर्व पत्र तयार झालें नाहीं ह्यास निरुपाय आहे; तरी हा अर्धा भाग नोटिसा, जाहिराती, पत्रें, उतारे वगैरे कांहीं न घेतां मुख्य मुख्य विषय लिहून तयार केलेला वाचकांस सादर केला आहे.

## दिल्ली दरबार

दिल्लीच्या दरबारच्या सुरवातीस अजून दीड महि याहून अधिक दिवस आहेत तरी तेथें आतांपासून तयारीची गर्दी होऊन राहिली आहे. तंबू, खुर्च्या, टेबलें आणि इतर फर्निचर यांच्या राशीच्या राशी येऊन पडल्या आहेत व नित्य नव्या येत आहेत. व तयारीकरितां आफिसर लोक नित्य नवे नवे नात आहेत. मद्रास व बंगाल सरकारचे एडिकर्यांप तेथें जाऊन दाखल झाले आहेत, मुंबईचे, नागपुरचे वगैरे इतक्यांत जातील. ठिकाठिकाणीं कोणाचे तंबू कोठें द्यावयाचे त्याचा नेम होऊन खुणा केल्या आहेत, तंबू लावण्याची सुरवात इतक्यांत होईल- व्हाइसराय साहेबाकरितां मोठें सिंव्हासन तयार होत आहे व त्यांच्या दरबार तंबूपर्यंत व त्या तंबूपासून दुसऱ्या मोठमोठ्या तंबूपर्यंत नवीन पक्क्या सडका तयार झाल्या आहेत. दिल्लीस बागा पुष्कळ आहेत तरी फुलें पुरणार नाहींत ह्मणून आग्रा, शारणपुर, व लखनौ एथील वगीचेवाल्यांशी ठराव करून शिवाय मद्रास व मुंबईकडूनही फुलें आणविण्याचा विचार आहे असें ह्मणतात.

कमानीची सुरेख गाडी व दोन घोडे याचें १५ दिवसांचें भाडें १००० रुपये बहुत लोकांचें ठरलें आहे. व साधारण प्रतीचे तांगे १० रुपये रोजावर ठरले आहेत व वेळेवर कोणास वाहन लागेल तर मिळेल किंवा नाहीं याची पंचाईतच आहे. व त्याकरितां आतांपासून लोक वाहनांच्या ठरावाच्या तयारीत आहेत. गायकवाड सरकारचे ५० हजार रुपयाचे तंबु खरेदी होऊन आले आहेत.

दुष्काळाचा संसर्ग ज्या ज्या प्रांतास आहे तेथील तेथील लोकांनीं दरबारास यावें किंवा न यावें हें त्यांच्या खुशीवर हिंदुस्थान सरकारानें ठेविलें आहे. तसेंच जे संस्थानिक कर्जभरू असतील, किंवा ज्यांचे खजिन्यांत पुष्कळ शिलक नसेल त्यानीं दरबारास येऊनये अशी हिंदुस्थान सरकारची इच्छा आहे.

## दुष्काळ.

पुणें सोलापुराकडील दुष्काळाच्या वार्ता दिवसानुदिवस जास्ती भयंकर ऐकूं येऊं लागल्या आहेत. व कांहीं ठिकाणीं अन्नावाचून चार चार दिवस उपास काढून मनुष्यें तटातट प्राण देऊं लागलीं आहेत. यावरून सरकारची नजर बरोबर या कामीं पोचली नाहीं असें दिसतें. इतक्या लवकर मरणाची पाळी आली तर मग सरकार इतकें विच्यार करीत आहे, व लोकांस जगविण्याकरितां लाखो रुपये खर्च करीत आहे त्याचा अर्थ काय! मनुष्य प्राणी मरूं नये याकडे सरकारानें अतिशय बारकाव्यानें लक्ष पोंचाविलें पाहिजे. बंगाल्याकडे याहून मोठा दुष्काळ पडला होता तरी सरकारानें मनुष्य मरूं दिलें नाहीं. व याकरितां साडेसहा कोटि रुपये तिकडे खर्च केले. त्याप्रमाणें इकडेही सरकार करीलच पण या कामीं लवकरच मन घातलें पाहिजे त्याविषयीं ढिलाई कामाची नाहीं. उडिसा प्रांतांतील दुष्काळांत ४० लक्ष मनुष्यें मरण पावलीं तेणें करून हिंदुस्थान सरकारास मोठा ठपका आला व त्याकरितां बंगालचे प्रसंगीं हिं. सर० फार सावधगिरीनें वागलें व तीच सावधगिरी आतां उपयोगांत आणिली पाहिजे. सरकारानें ९ जिल्हे मिळून ११ लक्ष रुपयांचीं कामें काढिलीं आहेत पण १० लक्ष लोक जर दुष्काळग्रस्त आहेत तर तीं कामें त्यांस किती दिवस पुरतील तें आह्मांस ठाऊक नाहीं. धोंड पासून मनमाड पावेतों १९ लक्ष रुपये खर्चून रेलवेचा रस्ता करावा असें मुंबई सरकारानें सुचविलें होतें पण हिंदुस्थान सरकारास ती गोष्ट पसंत झाली नाहीं. त्याचें एक ह्मणणें असें होतें कीं दुष्काळग्रस्त लोकांस जागच्या जागीं मदत करणें फार चांगलें. सबब एकाच जिल्ह्यांत रेलवेचें लांब लचक काम सुरू करण्यापेक्षां जिल्ह्यांतून तालुक्या तालुक्यानिहाय कामें काढावीं व लोकांस जगवावें. हा विच्यार फार उत्तम आहे. पण तो शेवटपर्यंत अमलांत आला पाहिजे व लोकांची जगवणूक झाली पाहिजे.

हें सरकाराविषयीं झालें पण लोकांनींही या गोष्टीस होईल तितकी मदत केली पाहिजे. मुंबईचे शेट मुरारजी गोकुळदास यांचें औदार्य व श्रम यांची वाखाणणी या प्रसंगीं लोकांचे तोंडून नित्य ऐकण्यांत येत आहे. त्यांनीं मुंबईच्या मंडळीकडून सुमार १ लक्ष रुपये वर्गणी जमवून गावोगाव पाठविण्याची तजवीज चालविली आहे. शिंदे सरकारानीं १५००० रुपये व होळकर सरकारानीं ६००० रुपये दिले. पुण्याची सार्वजनिक सभा या कामीं फार झटत आहे. सोलापुरचे कलेक्टर मि० ग्रांट साहेब तर केवळ दामाजी पंत झाले आहेत. नगर, पंढरपुर इंदापुर वगैरे ठिकाणींही सभा होऊन लोकांस मदत करण्याचें काम चालूं झालें आहे. तरी अजून हजारों ठिकाणाहून लाखो रुपयांची मदत गेल्याशिवाय तिकडील लोक जगणार नाहींत. दरमाणसीं महागाच्या सबबेनें ५ रुपये महिना धरले [illegible] एक वर्षभर ६० लक्ष लोकांचे जीव वांचविण्यास ३६ कोटि रुपये पाहिजेत. व ही संख्या फार मोठी आहे यांत संशय नाहीं. पण हिंदुस्थानांत १० कोटि प्रजा आहे हें मनांत आणून सर्वांनीं भूतदया व आपलें कर्तव्य स्मरून लक्ष्य पूर्वक झटलें असतां ही रकम मोठीशी बोजा सारखी नाहीं. त्यांत दयाळु सरकार आपला बराच मोठा वाटा उचलीत आहे मग आपण उदासीन कां रहावें? गावोगाव मंडळी जमवून वर्गणी जमा करावी व दुःखितास द्रव्य अगर धान्य लवकर पाठवावें.

आमचे अकोल्यास या गोष्टीची अजून उचल झाली नव्हती पण लिहिण्यास संतोष वाटतो कीं त्या शुभ शकुनाचा योग आतां आला आहे. व उद्या सायंकाळी टौनहालांत सभा भरणार जाहे. त्या प्रसंगीं सर्वांनीं हात न आखडतां अन्नावाचून मरणारांच्या दुःखानें विव्हाळ होत्सातें ईश्वरास स्मरून उदारपणें सहाय देण्याची कृपा करावी- हा खरोखर पुण्याचा सवदा आहे व ईश्वराचे घरीं रुजू होणारा आहे सबब जितका हात सढळ वाहूं शकेल तितका वाहूं द्यावा अशी आमची सर्वांस प्रार्थना आहे.

## जनावरांस नव्या तऱ्हेची वैरण.

प्रसंग प्राप्त होतो तसतशी मनुष्यास युक्ती सुचत जाते. व अवश्यकता येते तसतसे मनुष्य जास्ती शोध करूं लागतो. ही दुनियेची साधारण रीत आहे. त्याप्रमाणें सालमजकुरीं दुष्काळामुळें जनावरांस चारा न मिळाल्यानें हजारों जनावरें मरण पावूं लागलीं हें पाहून जनावरास स्वस्त जिन्नस काय खाऊं घातल्यानें तीं वाचतील याचा शोध करीत असतां पुढें लिहिलेली युक्ती आढळली.

मद्रास इलाख्यांत बेलारी येथें मेसर्स हरवे आणि सद्दापाथी यांचीं जनावरें आहेत तीं चाऱ्यावाचून उपाशी मरूं लागलीं असें पाहून त्यांनीं निवडुंगाचे फडे आणून त्यांस खवयास घालण्याची सुरवात केली, तेव्हांपासून त्यांचें पोटभरून तीं सुरक्षित राहिलीं आहेत व पुढचा पर्जन्य काळ येईपावेतों तीं आरोग्यकारक स्थितींत गहातील अशी त्यांची खात्री झाली. त्यावरून त्यांनीं लोकांस या वैरणीविषयीं शिफारस केली पण कोणाचे मनास ती गोष्ट येईना. शेवटीं एकेदिवशीं बाजारांत २०० जनावरें लोकांनीं विकावयास आणिली आहेत व त्यांस कोणी घेतनाहींत असें पाहून आपले २ बैल बाजारांत सर्व लोकांचे पुढें आणिले व त्याकडून निवडुंगाचे फडे खावविलीं व किती दिवसांपासून ते बैल ते फडे खाऊन कशा स्थितींत आहेत तें सांगितलें त्यावरून कांहीं लोकांचा भरवसा पटला व ते आपलीं जनावरें न विकतां माघारीं घेऊन गेले. या साहेबानीं निवडुंगाचे फडे तोडण्याकरितां लोखंडाची तीन हत्यारें केलीं आहेत. येक चिमटा येक खरडव येक सुरी. हीं तिन्ही दोन आण्यांत होतात. चिमट्यानें निवडुगाचा फडा दाबून धरावा, खरडानें त्यावरील काटे घासून काढावे, व सुरीनें फडा कापून घ्यावा. नंतर तो पाण्यांत बुडवून गोणताटानें घासावा ह्मणजे त्यावरील बारीक सारीक काटे जाउन तो साफ होतो मग जनावरास घालावा. पहिल्यानें तीन च्यार दिवस जनावरास सवय होईपर्यंत तो ठुमडून किंवा तोडून त्यांच्या तोंडांत घालावा. ह्मणजे पुढें तीं पेंड, सरकी, किंवा घुगऱ्याप्रमाणें आवडीनें खाउं लागतात व त्यांपासून त्यांचें पोषण होतें व कांहीं विकार होत नाहीं असें ते खात्रीनें ह्मणतात.

या गोष्टीचा अनुभव पहाण्यास सर्वांस साधन आहेच ह्मणजे; निवडुंग सर्वत्र आहेत. व पुष्कळ ठिकाणीं गुरें उपाशीं मरत आहेत सबब त्यांनीं तीं जगविण्याकरितां या गोष्टीचा अवश्य प्रत्यय पहावा.

शेतीचा सर्व भर जनावरांवर आहे व तीं एकदा मरण पावलीं ह्मणजे पुन्हा तितकीं पैदा होण्यास बराच काळ लागेल व तावत्कालपर्यंत देशांत धान्याची उत्पत्ति यथास्थित होणार नाहीं याजकरितां सदर्हू साहेबांनीं सरकारास असें सुचविलें आहे कीं तालुक्या तालुक्याचीं गुरें एकत्र करून अशा प्रकारानें जगवावीं व पाऊस पडल्यानंतर ज्यांचीं त्यांस परत द्यावीं.

दोन बैलांचें पोट भरण्यापुरतीं निवडुंगाचे फडे तोडण्यास एक मनुष्यास दिवसभर खपावें लागेल, त्या मानानें तितकीं मनुष्यें व जनावरें आपले स्वाधीन केल्यास खुद्द आपण हजारो गुरें जगवून देऊ असें सदर्हू गृहस्थ सरकारास कळवितोहेस.

### आनंदाची गोष्ट.

असें वर्तमान आहे कीं नेटिव लोकांस जडजाच्या व कलेक्टरच्या जागा देण्याचा सरकारचा विच्यार आहे; व ती आनंदाची गोष्ट जानेवारीचे पहिले तारखेस राणी साहेब चक्रवर्तिनी होणार त्या दरबारचे समारंभास होणार. त्याकरितां मद्रास सरकारानें २. मुंबई सरकारानें ३, व बंगाल सरकारानें २ गृहस्थांची शिफारस केलेली आहे. व त्याप्रमाणें त्या प्रसंगीं घडुन आलें तर या आनंद दायक गोष्टीचें चिरकाल स्मरण रहाणार आहे. मुंबई सरकारानें ज्यांची शिफारस केली आहे ते गृहस्थ मि० डोसा भाई फ्रामजी, मि० पेस्तमजी जाहांगीर, व मि० खंडेराव चिमणराव बेदरकर.

**महामारी** चा आजार या आठवड्यांत कमी झाला हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. गुदस्त सालीं सांऱ्या वऱ्हाडां-

त मिळून २२४६९ मनुष्यें या बाईनें ब-ळी घेतलीं तरी ती संतुष्ट न होता या व र्षीं ही भक्ष शोधण्यास आली हें पाहून फार दुःख वाटतें. यावर्षीं मुंबई मद्रासक डे दुष्काळ पडला आहे व कांहीं जि-ल्ह्यांत महामारीचा आजारही सुरू झा ला आहे ही मोठी काळजीची गोष्ट आहे. तिकडे ही गुदस्त सालीं आहुती थोडी झा ली असें नाहीं. मुंबई इलखा ४७५७३, मद्रास ९७०५१ वायव्यप्रांत ४११०६, मध्यप्रांत १४६४३, अयोध्याप्रांत २३१२१ व पंजाबप्रांत ६२४६ ह्मणजे सुमारीं ४ लक्ष मनुष्यें गिळून ही बाई भुकेलीच, व देशो धडीस फिरणारीच!

आमच्या नामांकित मोरोपंत कवीनीं मंत्र रामायणांत एके ठिकाणीं मारीच रा. क्षसाची उक्ती लिहिली आहे तींत महा-मारीच्या मरणाविषयीं असें सांगितलें आहे कीं! आर्यार्धः—

गंगेच्या करि द्यावा
धीरें वीरें न काय मारीच्या ॥

ह्मणजे रावणानें मारीच्यास सांगितलें कीं तूं सुवर्णमृग होऊन सीतेकडे चल ह्मणजे ती मला प्राप्त होईल. मारीच्य ह्म णाला, राम ईश्वर आहे त्याच्या स्त्रीविषयीं तूं दुष्टबुद्धि धरूं नको, तो मला व तुला ही ठार मारील. रावण ह्मणाला तें पुढचें असो पण तूं न चलशील तर मी तुला आतांच ठार मारितों. हें ऐकतांच मारी-च्यानें विच्यार केला कीं दोहोंपक्षीं ही मरण प्राप्त होणार आहे तर रावणा पेक्षां रामाकडून मरणें चांगलें व याच प्रसंगीं तो ह्मणाला कीं महामारी पासून मरण्या पेक्षां गंगेत उडी घालून जीव देणें चांग लें! अस्तु, परमेश्वरानें कृपा करावी व असलें दुष्ट मरण कोणाला येऊं देऊं नये.

या वर्षीं अकोल्यास या महिनाभर हवे च्या उपद्रवांत डा. अप्पा कानू यांनीं फा र परिश्रम केले. व दिवसांतून तीन तीन चार चार खेपा फिरून आजारी लोकांस औषधें दिलीं व त्यांचा समाचार घेतला तेणेंकरूनही हा आजार लवकर संपला व कमी उपद्रवकारक झाला याबद्दल डा० मजकूर यांची स्तुति करणें आह्मांस योग्य वाटतें. इतर ठिकाणाप्रमाणें एथीलही म्यु निसिप्यालिटीनें त्यांनां या विशेष कामाब द्दल कांहीं देणगी द्यावी अशी आमची शिफारस आहे.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत धान्याचा दर ८।१० रुपयांनी मंदावला आहे.

राव साहेब नारायण भाई यांची स्वारी आज उद्या फिरावयास निघणार.

दिल्लीचे दरबारास वऱ्हाडांतून कमिश नर साहेब शिवाय करून कोण कोण सरकारी कामदार जाणार हें आह्मांस अजून समज लें नाहीं. पुण्याच्या डेकनकालेजांतील प्रो फेसर रा. रा. केरालक्ष्मण छत्रे यांस आमं त्रण झाल्याचें वर्तमानपत्रावरून समजतें आ णि अशीं जर आमंत्रणें झालीं आहेत तर आमच्या वऱ्हाडांतील विद्याखात्याचे मुख्या धिकारी रावसाहेब नारायणभाई डायरेक्टर यांस आमंत्रण जरूर पाहिजे होतें. पण ते आलें नाहीं असें दिसतें. कदाचित रेसिडें ट व कमिशनर मार्फत फिरत फिरत येत असेल किंवा येणार असेल तर आह्मांस ठाऊक नाहीं. परंतु बोलावयाचा बेतच नसेल तर एवढ्या मोठ्या इकडील हिंदु अधिऱ्यास अशामहत्प्रसंगीं विसरावें हें दुर्ल क्ष्य मोठें दोषास्पद असें आह्मी समजतो व उमेद बाळगतो कीं अजून या गोष्टीचा विच्यार होईल!

या खेपेच्या महामारीच्या सपाट्यांत आमचे अकोल्यांतील एक उत्तम रत्न गेलें. मि० मौलवी जहिरूद्दीन हिंदुस्थानी शाळां वरील डिपुटी इन्स्पेक्टर वाख्याचे उपद्रवा नें आजारी होते व गेल्या रविवारीं त्यांचे आजारास चार दिवस होऊन गेले होते व प्रकृति उतारास लागली होती ह्मणून ईश्वर कृपेनें त्यांस आरोग्य झालें असें आ-ह्मी लिहिलें होतें पण दुर्दैवामुळें ईश्वरानें आपली कृपा माघारीं घेतली व गेल्या मंगळवारीं त्यांस काळमुखीं व लोकांस शोकसागरीं लोटून दिलें! मौलवी ज-हिरूद्दीन हे चांगले हुशार असून स्वभावा नें सुशील सद्गुणी व फार भले होते. सर्व मुसलमान लोकांचें त्यांवर अत्यंत प्रेम हो-तें व नेटिवांतही त्यांस न चहाणारा कोणी नाहीं; ह्मणून असा दुर्मिळ मोहरा आम-च्यांतून नाहींसा झाल्याबद्दल आह्मास फार दुःख वाटतें.

गेल्या आटवड्यांत हैदराबादेस मध्यव स्तींत आग लागून व्यापाऱ्यांची १२ दु-कानें जळालीं. नुकसान दहा पांच लाखां चें झालें असें ह्मणतात.

मि. आर. ई. क्यांडी साहेब मागें इकडे विद्याखात्याचे डायरेक्टर होते त्यांस अहम-दनगरास एकस्ट्रा फर्स्ट असिस्टंट कलेक्टर नेमिलें.

एथील एकझिक्युटीव इंजिनियर यांनीं रेसिडेंट साहेबास लिहिलें आहे कीं कांहीं रस्त्यांची कामें करण्या विषयीं मंजुरांत दि-ली असतां दुष्काळाचे मु खांतून ६००० हजार लोक आले तरी त्यांस वर्षभर पर्यं त आह्मी काम देऊं. अथवा १२००० लोक आल्यास ६ महिने काम देऊं. हें अवश्य घडावें असें आह्मी इच्छितो.

जुडिशियल कमिशनर साहेबापुढें उ-द्या उमरावतीस एक सेशन मुकदमा आ हे. तो पाहून मंगळवारीं ते मलकापुराकडे येणार. तेथें व त्या लगत्यास एक दोन दिवस त्यांचीं कामें नेमिलीं आहेत. व त्या च सुमारास कर्नल नेभार्ड साहेब कमिशन र हैदराबादेस जाण्या करितां निघाले तर वाटेंत हे ही त्यांस मिळून बरोबर जातील. नाहीं तर पुढील सोमवारीं ह्मणजे २० वे तारखेस बुलढाण्यास सेशन नेमिलें आहे तिकडे जातील.

Mr. Ganesh Srikrishna Khaparde, a young Berar student, made a speech in the Anglo-vernacular school here on Monday last. The subject was well-chosen, the gestures manly, and the delivery altogether pleasant and fascinating. A little more slowness in speaking would have made it exceedingly eloquent, but as it was, it was highly creditable and nothing more could be reasonably expected from Mr. Khaparde. The general opinion about the lecture, was, that it exhibited increasing powers of mind, and showed that his thoughts had acquired maturity, and his education might be said to be sound. We hail him as one of our first Berari University-men. This gentleman has passed the F. A. examination and will go in for the degree of B. A. next year. We are glad to find he is son to Mr. Srikrishna Narahara one of our best extra assistant Commissioner's, Since it appears that Government has lately set an example of choosing attachees from among the sons of the native officers here it would be very well, in our opinion, if the Resident recommends men like Mr. Khaparde for a similar post. This step, we are inclined to think, would afford a practical illustration of the political maxim of raising well-bred young men from Berari good families, to official eminence, equally with others, in their own districts.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे इलि चपुराहून मुंबईस जातांना येथें आले होते त्यांनीं इकडील तरुण विद्वानांचीं कर्तव्य कर्में या विषयावर इंग्लिश भाषेंत गेल्या सोमवारीं फार उत्तम व्याख्यान दिलें. हे रा. रा. श्रीकृष्ण नरहर एकस्ट्रा असिस्टट कमिशनर यांचे चिरंजीव आहेत व बी. ए. च्या परीक्षेकरितां कालेजांत अभ्यास करी त आहेत. वऱ्हाडांतील गृहस्थ, मोठ्या का मदारांचे चिरंजीव, आणि त्यांत अशी उ त्तम विद्या संपादन केलेले अशांना वऱ्हा डांत मोठाल्या जागा मिळाव्या हें फार अवश्य आहे. मे० रेसिडेंट साहेबानीं नुक ताच असा क्रम सुरूही केलेला आहे त्या धोरणानें यांनांही पुढें मागें मोठी जा गा रेसिडेंट साहेब देतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

हिंदुस्थान सरकारचे ठरावा वरून रे सिडेंट साहेबानीं जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे कीं महाराणी साहेबानीं चक्रवर्तिनी असा किताब धारण करण्याचा समारंभ जानेवारीचे पहिले तारखेस होणार आहे सबब त्या महिन्याचे पहिले तारखे पासून ८ वे तारखे पर्यंत सर्व सरकारी कचेऱ्यांस सुटी दिली आहे.

कर्नल अलार्डाईस साहेब जुडिशियल कमिशनर लवकरच नोकरी सोडून विला-यतेस जाणार असें वर्तमान आहे त्यास दु सरीकडूनही आधार दिसतो. अलाहाबाद-चे पायोनियर पत्रांत लिहिलें आहे कीं व-ऱ्हाडचे जुडिशियल कमिशनरची जागा लवकरच रिकामी होणार आहे व तिजवर तिकडील कोणा अधिकाऱ्यांचा विशेष हक्क नसेल तर ती वायव्य प्रांतांतील सिविल सर्व्हिस पैकी कोणास द्यावी.

हैदराबादेहून पत्र आल्यावरून आह्मांस समजत कीं फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यांत कर्नल अलार्डाईस साहेब इकडील नोकरी सोडितील. व तसें झालें असतां आमचें म त आहे कीं मेजर बेल साहेब ज्यांनीं पुष्क ळ महिने जुडिशियल कमिशनरचें काम केलें व तें फार उत्तम रीतीनें केल्याबद्दल रेसिडेंट साहेबानीं ज्यांची तारीफ केली आहे त्यांसच कायमची जागा द्यावी. व त सें घडेल असें आह्मी इच्छितों.

हिंदुस्थानी डिपुटी इन्स्पेक्टरची जागा १५० रुपयांची होती ती १२५ची करू-न मि० नूरखान ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सि-पालची जागा रिकामी आहे ती कोणास मिळतें पहावें.

मि० नूरखान यांस डि० इ० ची जा-गा मिळाली हें पाहून आह्मांस संतोष हो तो. पण त्या जागेचा पहिलाच पगार कायम असून यांस ३० रुपये बढती झा-ली असती तर आह्मांस अधिक संतोष हो ता. १२५ रुपयावर दुसरे इन्स्पेक्टर आहेत च आणि हिंदुस्थानी शाळां साऱ्या ९० आहेत ह्मणून या जागेचा पगार डायरेक्ट र साहेबांनी कमी केला असें वाटतें.

इलिचपुरचे ६० रुपयांचे फ.अ. मास्त र रा. रा. धोंडो त्रिंबक यांस डायरेक्टर सा हेबांचे आफिसांत ६० रुपयांवर क्लार्क ने मिलें. व देऊळघाटचे ७५ रुपयांचे मास्तर रा. रा. गंगाधर सिताराम यांस साठ रुप यांवर इलिचपुरास नेमिलें. व देऊळघाट ची जागा २५ रुपयांची केली.

पंढरपुरच्या कित्येक उदार मंडळीनीं सभा करून पैसे जमवून इकडून धान्य नेण्याचा क्रम सुरू केला आहे. व त्या प्रमाणें सात आठ हजारांचें धान्य तिकडे गेलें. हल्लीं नवीन खरेदीकरितां तिकडून रा. रा. गणेश जिवाजी केळकर वकील आले आहेत. हे गृहस्थ इकडे पूर्वीं शाळा खात्यांत व नंतर मुलकीखात्यांत होते. व आलीकडे मुंबईस वकिलीची परीक्षा देऊ न त्यांनीं पंढरपुरास आपली नेमणूक करू न घेतली आहे. त्यांच्याहूनही एक देशपां डे गृहस्थ याच कामाकरितां आले आहेत.

## वर्तमानसार

दिल्लीजवळ स्फटिकाची एक जुनी खाण सापडली.

बंगालचे दुष्काळा करितां मद्रासेहून गेलेले २०००० रुपये शिलकेंत होते ते आतां मद्रासच्या दुष्काळाकडे पाठविले.

मुंबई इलाख्यांत दक्षिण भागचे रेवि-न्यु कमिशनर मि० हावलाक साहेब मरण पावले. त्याबद्दल सरकारानें आपला एक मोठा मुत्सद्दी गेला ह्मणून दुःख प्रदर्शि-त केलें आहे.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० १९ माहे नोवेंबर सन १८७६ इ० अंक ४६

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा

रायजी मर्द भदू आखरे इला भदू वल्द राघोजी आखरे वस्ती मौजे सिरसोली तालुके अकोट जिल्हा अकोला याजकडून नोटिसीचा जबाब देण्यांत येतो कीं तूं मला वर्तमानपत्रमार्गें नोटिस रजिस्टर करून दिली ती तारीख ३१ अक्टोबर सन १८७६ इसवी रोजीं पोहोंचली तिचें उत्तर येणेंप्रमाणें:—

माझे तुशीं लग्न लागल्यास ८ वर्षें झालीं व पदर येऊन ३ वर्षें झालीं आहेत. मध्यंतरीं तुला २।३ वेळ एथें आणिलें परंतु तुझें चैतन्य एके ठिकाणीं नसून तुला दुसऱ्याचा फितूर असल्याचा प्रकार माझे आढळण्यांत आला व चाल खराबदिसली यावरून तुजकडे माझे मन अगदी लागत नाहीं तशांत तूं पळूनही गेलीस मग तर अगदीच मनांतून उतरलीस तेव्हां आतां तुशीं सृष्टिमार्ग करणें बेवकुवाचें काम आहे व जो कुलवान मनुष्य आहे तो कधीं भाषण करणार नाहीं. तूं फितुरामुळें नोटिसींत लग्नास १६ वर्षें झालीं व पदर येण्यास ६ वर्षें झालीं ह्मणून खोटा मजकूर लिहिलास हा मला कबूल नाहीं.

माझे अंगीं पुरुषत्व नाहीं असें तूं ह्मणतेस परंतु ही गोष्ट मला कबूल नाहीं तूंझी वर्तणूक चांगली असली तर सर्व प्रकार घडून येता आतां माझे मनांत तुझे गैरचालीवरून वागविण्याचें नाहीं ह्मणून समज देतों कीं तूं एथें येऊन लग्नाचा सर्व खर्च दिल्याशिवाय मी तुला मोकळीक देत नाहीं यावरतूं न ऐकशील तर या नोटिसीवरून फिर्याद करून पैसा भरून घेतला जाईल व तुझी बेइजत करीन हें लक्षांत ठेवावें कळावें तारीख २ नोवेंबर सन १८७६ इसवी.

( सही ] भदू वल्द राघोजी आखरे
दस्तुर खुद्द

### नोटिस.

बनेचंद लखमीचंद मारवाडी दुकान निंबा तालुके बाळापुर जिल्हे अकोला यांजकडून गणू वल्द लक्ष्मण न्हावी रहाणार मौजे मजकूर यास नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मांस जवारी निंब मापाची २८ रुपये प्रमाणें ३ खंडी देऊं केली असून आज ९ दिवस झाले जवारीचें माप देत नाहीं तर नोटिस पोंचल्यापासून ४ दिवसांचे आंत जवारीचें माप देऊन आपले रुपये घेऊन जावे असें न केल्यास बाजार भावाप्रमाणें नफ्याचे २१ रुपये शिवाय नोटिशीच्या खर्चासुद्धां दिवाणींत दावा करून घेण्यांत येईल कळावे तारीख ८ माहे नोवंबर सन १८७६ इसवी.

( सही ) बनेचंद लखमीचंद मारवाडी
दस्तुर खुद्द.

### नोटिस

रामासा परशरामसा साहू दुकान कसबे मलकापुर तालुका मजकुर जिल्हा बुलडाणें यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, मी आपल्यास ता. २।११।१८७६ इसवी रोजीं टपाल मार्गानीं रजिस्टर करून नोटिस पाठविली आणि नोटिशीच्या मुदतीप्रमाणें आपल्या जबाबाची वाटही पाहिली परंतु कांहीं जबाब मिळाला नाहीं त्यावरून पुन्हा आपल्यास जाहिर करण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून व लग्नास आज सुमारे वीस एकवीस वर्षें झालीं तेव्हांपासून तुह्मी माझ्याशीं संसार करीत नाहीं व ने आणही बरोबर रीतीप्रमाणें होत नाहीं तथापि मी साल गुदस्त पावेतों आपले मतानें तुमचे घरीं येऊन राहिले कीं, तुह्मी माझ्याशी संसार कराल अशी आशा होती परंतु तसें न करितां उलट माझ्या जिवास ताप देऊन नीतिविरुद्ध वागूं लागलें. ते असें कीं मी तुमचे कोणतेही जिनसेस हात लावला असतां ह्मणजे ज्या जिनसांस माझा स्पर्श झाला असतां मग ती हलकी असो किंवा भारी असो तिचा आपण तात्काळ नाश करितां या प्रमाणें तुह्मी व तुमचे घरांतील सर्व मंडळी मजला त्रास देऊं लागले तो त्रास मजला सोसवेना सबब मी लाच्यार होऊन गुदस्त सालीं आपले आई बापाचे घरीं जाऊन राहिली त्याजला सुमारे आज दोन वर्षें होत आलीं. परंतु अद्यापपर्यंत माझा कोणत्याही प्रकारें समाचार घेतला नाहीं. करितां हल्लीं या नोटिशीनें आपणास कळविण्यांत येतें कीं तुह्मी मजला नेऊन जनरीतीप्रमाणें व लोकरूढीस अनुसरून तुह्मी माझ्याशीं संसार करावा. अगर तसें होत नसल्यास मजला तुमचे योग्यतेप्रमाणें दरमहा खर्चास १०० रुपये देत जावे. ह्मणजे मी आपले आई बापाचे अगर दुसरे ठिकाणीं राहून काळक्रमण करीन. जर करितां आपण आतां संसार करण्याची मनोवृत्ती धरिली असल्यास मी त्याप्रमाणें आपल्या चरणापाशीं येण्यास तयार आहे परंतु तुमच्या घरीं येऊन रहाण्याची मजला पूर्वींच्या दहा बीस अनुभविक गोष्टींवरून भीति वाटते करितां आपण मजला माझ्या खात्रीलायक एक जामीन द्यावा. ह्मणजे मी त्याप्रमाणें येऊन राहीन. सदर्हू वर लिहिलेल्या मजकुराचा योक्त विच्यार करून, आपल्या लायकीकडे, धर्मशास्त्राकडे व नीतिशास्त्राकडे लक्ष देऊन या नोटिशीचा जबाब पावल्यापासून बारा दिवसांचे आंत माझा कायदेशीर मुख्त्यार माधवसा नारायणसा हा मलकापुर मुक्कामीं गणपत केशव याचे घरीं आहे त्याजला द्यावा. जरकरितां मुदतीच्या आंत जबाब न आल्यास शिरस्त्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल करितां नोटिशीनें कळविलें आहे कळावें. तारीख ११ माहे नोवेंबर सन १८७६ इसवी.

(सही) सिताबाई भ्रतार रामासा
दुकान मलकापुर हल्लीं
मेहेकर दस्तुर माधवसा
नारायणसा कुलमुख्त्यार.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. ह्या चार ओळी आपले पत्रीं प्रसिद्ध करण्याकरितां पाठविल्या आहेत.

जळगाव तालुक्यापैकीं जामोद हा गाव कसब्याचा असून एथें हजार बाराशें घरांची वस्ती आहे. पूर्वीं ह्या गावीं वस्ती ७।८ हजाराची होती असें ह्मणतात. परंतु त्या मानानें हल्लीं वस्ती फार कमी आहे. एथें पूर्वींची प्राचीन देवळें आहेत. त्यांत नारायणेश्वर महादेवाचे ऊर्फ बेवळा हें देऊळ फार चांगलें बांधलें असून पहाण्यासारखें आहे. आणखीही मुसलमान लोकांचे दरगे चांगले आहेत. एथें लोअर क्लास शाळा आहे. शाळेमध्यें मुलें बरींच असून हेडमास्तर व आसिस्टंट मास्तर यांच्या मेहेनतीनें मुलांचा अभ्यासही बराच दिसतो. हल्लीं लिहिण्यासारखी गोष्ट ही कीं एथील शाळेचे असिस्टंट मास्तर बळवंत गणेश सामण हे नाशिकचे रहाणारे असून कसरतीमध्यें फार उत्तम आहेत. यांनीं नाशकास चार पांच वर्षें अभ्यास केला आहे. एथें यांनीं शाळेची वेळ राखून गावांतील व शाळेतील लहान मुलें कसरतीमध्यें चांगलीं तयार केलीं आहेत,

डिपुटी कान्सरवेटर मेळघाट यांची स्वारी ता. ३१ मिनहू रोजीं जामोदास आली होती. त्यांचे हेडक्लार्क शिरस्तेदार वगैरे मंडळीनें तीं मुलें दहा वाजतां बोलावून गावांत खेळ करविला. खेळ चांगला झाला. नंतर त्यांचे वरिष्ठ अधिकारी मे० ड्रेसडेल साहेबांस सांगून सायंकाळचे वेळेस चार वाजेपासून ६ वाजे पावेतों खेळ, व लखांब, कुस्ती, उड्या वगैरे होऊन मे० साहेबानीं सहा मुलांस एक एक रुपया इनाम दिला आणि खेळ पाहून फार खुष झाले.

असिस्टंट मास्तर यांचा बेत आणखी शाळेंतील मुलांस कसरत शिकविण्याचा आहे. पहा बरें कसरत करणें हें मोठें महत्वाचें व आरोग्य संरक्षण करण्याचें साधन आहे. मोठमोठ्या ठिकाणीं कसरतीच्या कामीं हजारों रुपये खर्च करितात व ह्यापासून फारच फार फायदे आहेत. एक तर आरोग्यसंरक्षण, चपलता, हुशारी इत्यादि आहेत. ह्या कामाला मेहेरबान डिपुटी कान्सर्वेटर साहेबानीं जी मदत व उत्तेजन दिलें त्याप्रमाणें वऱ्हाडांतील युरोपियन व नेटिव अमलदार यांस मदत व उत्तेजन देतील ही आशा आहे.

शाळाखात्याचे डायरेक्टर सा. यांस माझी विनंती आहे कीं अशा तरुण कसरत शिकलेल्या असिस्टंट मास्तरास एखादे जिल्ह्याचे ठिकाणीं अगर तालुक्याचे ठिकाणां ठेवल्यास शाळेंतील मुलांचे व लोकांचेही ह्यांच्या कसरतीचे गुणापासून फायदे होताल. कळावें तारीख १ माहे नोवेंबर सन १८७६ इसवी.

एक जामोदकर

## वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष शुद्ध ४ शके १७९८

## एतद्देशीय कलाकौशल्यास सरकाराकडून उत्तेजन.

आलिकडे आमच्या देशावर जे गव्हर्नर जनरल येतात त्यांचा मुख्य हेतु ह्या देशांतील लोकांचें हरएक प्रकारें करून हित व्हावें हा असतो. राजानें प्रजेचें निरंतर कल्याण व्हावें अशी इच्छा अंतःकरणांत धरली ह्मणजे प्रजेच्या मनांतही राजाविषयीं किती कृतज्ञता असते हें सांगणें नकोच. आमच्या देशाचें अधिपत्य इंग्रज सरकाराकडे जेव्हां गेलें तेव्हां त्यांणीं ह्या देशांतील लोकांचें कल्याण करण्याची इच्छा दर्शविली होतीच व त्याप्रमाणें त्यांजकडून बरेच दिवस वर्तनही झालें, मध्यंतरीं आमच्या देशांतील लोकांचे कांहीं दिवस वाईट आले होते व त्यावेळीं हरए

क तऱ्हेने एतद्देशीय लोकांस पर तोंड काढण्यास मार्गच राहिला नव्हता. परंतु असे दिवस लवकरच निघून गेले असे आलीकडील इंग्रजी राज्याच्या वहिवाटीवरून ह्मणण्यास आह्मास बराच आधार होतो. मध्यंतरीं आमच्या लोकांचे वाईट दिवस आले होते हें जें आह्मी वर लिहिलें आहे त्याचा दोष बहुतेक अंशीं आह्मा लोकांकडेही येतो. या देशांतील लोकांत आलीकडे ह्मणजे सरासरी १०।१२ वर्षांपासून बरीच जागृतवस्था प्राप्त होत चालली आहे. व त्या योगेंकरून आमचीं गाऱ्हाणीं सरकारचे कानावर जाऊं लागलीं व सरकारही त्याचा योग्य विच्यार करावयास लागलें. व असें चालल्यामुळें या देशांतील लोकांचें यापुढें हल्लींच्याहूनही विशेष कल्याण होण्याचा पूर्ण संभव आहे.

आज आमचे मनांत हे विच्यार येण्यास बरींच कारणें आहेत. एतद्देशीय लोकांस मोठ्या हुद्याच्या जागा आजपर्यंत मिळणें दुर्लभ होतें परंतु लार्ड नार्थब्रूक साहेबांच्या कारकीर्दींत कांहीं नेटिवांस तशा जागा मिळाल्या. लार्ड लिटन साहेबांच्या कारकीर्दींत आमच्या देशांतील लोकांचें भाग्य चांगलें उदयास येण्याचीं चिन्हें आज दिसत आहेत. येत्या जानेवारींत दिल्ली येथें जो दरबार होणार व आपल्या महाराणी साहेबांनीं नवीन किताब घेतल्याचा जो आनंद प्रदर्शित व्हावयाचा त्या प्रीत्यर्थ कित्येक नेटिव सभ्य हुशार गृहस्थांस कलेक्टर, जड्ज इ० हुद्याच्या जागा खास मिळणार असें इंग्रजी वर्तमानपत्रांवरून समजतें. ईश्वर करो आणि ही खबर खरी होवो असें आह्मीं इच्छितों. बरें, एवढ्या एकच गोष्टीवरून आमची स्थिति चांगली होणार असें नाहीं. देशाची वास्तवीक उत्तमावस्था रहाण्यास मूळ जी संपत्ति, ती बरेच दिवसांपासून पश्चिमेकडे इतकी जावयास लागली आहे कीं ह्या देशांतील व्यापार अगदीं बुडाला; लोक गरीब झाले; लोकांची उमेद खचून गेली; उत्तम कारागिरांचे कसबाची कोणी चहा करीतनासे झाले. असें जेव्हां फार झालें तेव्हां आमचे लोकांचीही आलीकडे बरीच हालचाल सुरू झाली. या देशांतील संपत्ति एकाच रूपानें विलायतेस गेली असें नाहीं परंतु संपत्ति मिळण्याचें मुख्य साधन जो व्यापार तो तिकडील जिनसांचा फारच व्हावयास लागला आणि त्यामुळें या देशांत तयार झालेल्या जिनसांस कोणीच विच्यारीतनासें झालें. इंजिनियरचीं कामें, आगगाडीचीं कामें, कीं जेथें कोट्यावधि रुपयांचें लोखंड व इतर सामान लागावयाचें तें सर्व तिकडून यावयास लागलें. मक्तेदार लोकही तिकडून यावयास लागले. आमच्या देशांत उत्तम कारागीर असतांही त्यांजकडे कलाकौशल्याच्या कामाची जबाबदारी देण्यास रेलवे कंपन्यांचा धीर होत नाहीं. अशी जेव्हां व्यापाराची व कलाकौशल्याची अवस्था झाली तेव्हां आमच्या देशांतील वर्तमानपत्रें व सार्वजनिक सभा ह्यांकडून फार गिल्ला झाला. परंतु त्याचा योग्य विच्यार हल्लींचे गव्हरनर जनरल लार्ड लिटन हे करावयास लागले हें पाहून मोठा आनंद होतो— ग्याझेट आफ् इंडियामध्यें त्यांनीं नुकताच एक हुकूम सर्व रेलवे, इंजिनियर व लष्करी इ० अधिकाऱ्यांस फर्माविला आहे कीं यापुढें ह्या खात्यांस जें पुढें विलायतेहून सामान आणावयाचें त्या पूर्वीं ह्याच देशांत उत्पन्न व तयार झालेल्या वस्तु प्रथम उपयोगांत आणाव्या, ज्या एथें मिळत नाहींत व तयार करावयास लागलें असतांही होणार नाहींत, असें सामान मात्र परदेशाहून आणावें. सरकारी आफिसांतून स्टेशनरी व लष्करी लोकांकरितां कपडा घेणें तोही ह्या देशांतील घ्यावा. फार तर काय परंतु रेलवेचे पूल इंजिनियर कडील कामांचे नमुने वगैरे जे करावयाचे ते इकडील सामान त्या कामांकरितां लावावयाचें असें समजून अंदाजा करावा. ह्मणजे विलायतेहून फार खर्च करून जें सामान आणावें लागतें तें लागणार नाहीं.

ह्या हुकुमावरून ह्या देशांतील कलाकौशल्यास किती उत्तेजन येणार आहे, याचा विचार आमचे वाचकांनींच करावा! ही सवड सरकारानें ह्या वेळीं फार चांगली दिली आहे व त्याप्रमाणें अशा प्रकारचे महत्वाचें सामान पुरविण्यास ह्या देशांतील कारागिरांस ही संधी चांगली आहे. आमच्या देशांतील कारागिरांची अशी स्थिति आहे कीं त्यांना कोणी त्यांचेच शिकलेले व विद्वान मित्रांकडून मदत मिळाल्याखेरीज त्यांचे प्रयत्न पंगू आहेत. मूळ त्यांची गरीबी असल्यामुळें एकादा मोठ्या कामाचा अथवा यंत्रें तयार करण्याचा पतकर त्यांच्यानें घेववत नाहीं. प्रत्येक ठिकाणच्या सार्वजनिक सभा, इतरसभा, राजे रजवाडे, मोठमोठे सावकार ह्यांनीं पुढारी होऊन हें काम आपले जोखमीवर घेतलें पाहिजे. निरनिराळे कारखाने स्थापन केले पाहिजेत व त्यांत हजारो कारागिर लोक ठेविले पाहिजेत "स्कूल्स आफ इंडस्ट्री" [ कलाकौशल्याच्या शाळा ] स्थापन झाल्या पाहिजेत. त्यांमध्यें शिकणारे उत्तम पाहिजेत. एतद्देशीय वस्तूंचीं प्रदर्शनें जीं हल्लीं २।४ ठिकाणींच होतात तीं यहून पुष्कळ ठिकाणीं व्हावीं तेणेंकरून कारागिरांस उत्तेजन येईल. कापडाच्या गिरण्या जशा स्थापन होत आहेत त्याप्रमाणें शिल्प कामास लागणारें सामान, आगगाडीच्या रस्त्यांस लागणारें सामान, इत्यादि तयार करण्याचेही कारखाने सुरू करण्यास ही संधी उत्तम आहे. अशीं कामें सुरू झाल्यानें आमच्या लोकांस धंदा रोजगार पुष्कळ सापडेल, लोक हुशार होतील, व्यापार वाढेल व ज्या संपत्तीचा फार दिवसांपासून ऱ्हास होत चालला आहे तो होणार नाहीं. कोणत्याही देशांतील लोक सर्वच वेळ सुखी असतात असें नाहीं, कांहीं तरी त्यांजवर कधीं कधीं प्रसंग गुदरतातच. त्याप्रमाणें हल्लीं ह्या देशांतील बहुतेक भागावर दुष्काळरूप भयंकर प्रसंग आला आहे त्याचे निवारणार्थ सरकार तजवीज करीतच आहे. अशा वेळीं जर आह्मी वर लिहिलेले कारखाने चालू असते तर लाखो लोकांस आपली उपजीविका करण्यास सांपडती. तेव्हां आह्मी जें कांहीं लिहिलें आहे ह्याचा विचार विलंब न करितां जितका होईल तितका करावा अशी आमची इच्छा आहे.

## व्यायाम.

आज ज्या विषयाचें प्रतिपादन करण्याचें आह्मी योजिलें आहे. त्याचें अद्यापपर्यंत कधीं उद्घाटन झाल्याचें आढळांत नाहीं. व हल्लींच्या काळीं ज्या विषयाचें उद्घाटन होणें योग्य त्यांतच याची गणना होणारी आहे. सबब या विषयाबद्दल चार ओळी लिहिण्याचें मनांत आणिलें आहे. सदरहू विषयाचा विचार करूं लागलें ह्मणजे त्याचे खालीं लिहिल्याप्रमाणें मुद्दे निघतात ( १ ) व्यायाम शद्बाची उत्पत्ती; मूळचा व आतांचा अर्थ. ( २ ) या शद्बांत दुसऱ्या कोण कोणत्या शद्बाचा समावेश होतो? ( ३ ) पूर्वींच्या काळीं हा शद्ब प्रच्यारांत होता किंवा नाहीं? अगर हें युरोपियन लोकांचें अनुकरण? अनुकरण नसल्यास त्याचीं उदाहरणें. ( ४ ) मनुष्याच्या जीवन व्यापारास आवश्यक अशा ज्या कांहीं संवयी आहेत, त्यांतच याची गणना व्हावी किंवा कसें? ( ५ ) व्यायामाचा उपयोग— पहिला उपयोग— शरीर सुधारणा, दुसरा उपयोग— चांचल्यवृध्धी, तिसरा उपयोग— मनास प्रसन्नता. आणि— ( ६ ) वा अथवा शेवटील— इतक्या महत्वाच्या विषयाकडे लोकांचें औदासिन्य असण्याचीं कारणें. आतां यापेक्षां जास्ती मुद्दे निघणार नाहींत असें नाहीं तरी निघाल्यास त्यांचा वरील सहा मुद्यांत समावेश होणारा आहे. वरील सहा मुद्यांचें अनुक्रमानें स्पष्टीकरण करूं.

१ व्यायाम शद्बाची उत्पत्ती; मूळचा व आतांचा अर्थ. हा शद्ब मूळ संस्कृत आहे. व हा यम = जाणें या धातूपासून निघालेला आहे. याचा अर्थ शरिरास श्रम व्हावा एतदर्थ केलेलें जें गमन अथवा श्रम असा होतो. आणि शुद्ध मराठींत एकवटीचा शद्ब शरिरोपयोगी श्रम असा करितां येईल, हा शद्ब प्राचीन काळापासून उपयोगांत आहे परंतु पूर्वीं या शद्बांत एकाच प्रकारचे श्रमाचा समावेश होत नसे, अनेक तऱ्हेचे सर्व श्रम या सदराखालीं घेत असत. कोणतीही गोष्ट मूळ चालू असून कालांतरानें तिचा लोप होऊन पुन्हा प्रदुर्भाव झाला ह्मणजे तिच्या मुळाकडे न पहातां बहुदृष्टया ती ज्यापासून प्रचारांत आली असें वाटतें तेंच तिचें मूळ असे ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. जसें व्यायामाची चाल आपल्या देशांत पूर्वींपासून चालत आली असून ती आह्मी इंग्लिश लोकांपासून घेतली असें ह्मणण्याचा प्रकार पडला आहे; पण तेच असें ह्मणणारे थोडा खोल विचार करून आपल्याच मनाची निवृत्ती करतील तर ही चाल फार प्राचीनपासून आमच्यांत चालू आहे असें त्यांस सहज आढळून येईल. तेव्हां या शद्बाचा मूळचा अर्थ शरिरास उपयोगी पडण्याजोगे कोणत्याही तऱ्हेचे तालिमबाजी, मुलांचे खेळ, वगैरे श्रम करणें हा आहे. व हल्लीं हा शद्ब एकाच तऱ्हेच्या सवयीला घोड्यावर बसून अगर पायीं प्रातःकाळीं किंवा सायंकाळीं कोस दीड कोस चालून येण्याकडे लावितात. तेव्हां या शद्बाचा आतांचा अर्थ युरोपियन लोकांसारखे कोस दीड कोस चालून येणें असा आहे.

या शद्बांत दुसऱ्या कोण कोणत्या शद्बांचा समावेश होतो? या सदराखालीं पुढील सर्व श्रम येतील. तालिमबाजींतील सर्व श्रम जोर काढणें, ऊठबशा करणें, मुद्गल फेरणें, बोथाट्या वगैरे. शेतकरी लोकांचे सर्व श्रम. मुलांचे लहानपणचे सर्व श्रम, विटी दांडू, आट्यापाट्या, सुरपारंब्या वगैरे. आतां शेतकरी तालिमबाज वगैरे जेव्हां श्रम करितात तेव्हां त्यांचा उद्देश व्यायाम करण्याचा असतो असें नाहीं. तरी त्यास व्यायाम शद्बाचा जो अर्थ आहे तो सहजगत्या घडतो. जसें भांडवलवाला ज्या वेळेस आपलें भांडवल एकाद्या कारखान्यांत घालतो त्या वेळेस त्याच्या कारखान्यांत मजूर वगैरे जे लोक असतात त्यांचा चरितार्थ चालावा असा त्याचा बिलकूल उद्देश नसतो. तरी त्याच्या त्या करण्यानें त्याची इच्छा नसून हजारों लोकांची त्याजवर उपजीविका होते. तद्वतच शेतकरी जो श्रम करितो तो आपल्या शेतापासून उत्पन्न व्हावें एतदर्थच. परंतु त्याच्या ध्यानीं मनीं जरी नाहीं तरी व्यायाम केल्याचा परिणाम त्याजवर आपोआप उत्पन्न होतो. याचप्रमाणें वरील दोन्ही श्रमांचें आहे. तेव्हां व्यायाम या सदराखालीं शेतकरी, मुलें, तालिमबाज वगैरेचे श्रमांची गणना होते.

पूर्वींच्या काळीं हा शद्ब प्रचारांत होता किंवा नाहीं ? अगर हें युरोपियन लोकांचें अनुकरण आहे? अनुकरण नसल्यास त्यांचीं उदाहरणें. सीत प्रदेशांतील गौरवर्ण लोकांची चाल या देशावर होण्याच्या आगोदर हा देश सर्व गोष्टींनीं विद्या, कला कौशल्य वगैरेत परिपूर्ण असून त्यावेळेस कोणत्याही देशास हार जात नव्हता अशाबद्दल एथें उल्लेख करण्याची जरूर नाहीं सर्वांस विदित आहेच. आमच्या देशांतील कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, पूर्वीं व्यायाम करण्याची चाल आपल्या देशांत नव्हती. हें परद्वीपस्थ लोकांचें आपल्या लोकांनीं केलेलें अनुकरण आहे. व ही आपल्याला एक टूमच सांपडली आहे. पण असें ह्मणणारे जर सिंहावलोकनानें मागील व्यवस्थेकडे पहातील तर पूर्वीं [illegible] त्यांत व्यायामाची चाल होती इतकेंच [illegible] तर ती सर्व साधारण झाली होती असें त्यांस दिसेल. तेव्हां व्यायाम करण्याची चाल पूर्वींपासून आमच्या देशांत आहे. हें युरोपियन लोकांचें अनुकरण नाहीं. अनुकरण नसल्यास त्याचीं उदाहरणें. उदाहरण ( १ ) तालिमबाजी, जोर काढणें, ऊठबशा काढणें, मुद्गल पेहलणें, बोथाट्या वगैरे ( २ ) मुलांचे लहाणपणचे सर्व श्रम खेळ, विटीदांडू, आट्यापाट्या सुरपारंब्या वगैरे, [ ३ ] शतपावली. ( ४ ) विविधज्ञानविस्तारांतील आज्ञापत्र. ( ५ ) पटवर्धन घराण्यांतील चाल. वर जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं सर्व व्यायामाचीं आहेत.

ही चाल आजच नव्हे, मुदतीपासून आमच्यांत चालत आहे. व्यायाम करण्याचा मुख्य उद्देश ह्मटला ह्मणजे शरिरास जो जडपणा आला असतो तो जाऊन चंचलपणा यावा. शरीर शिथिल होऊं नये. शरिरास ज्या व्याधी जडल्या असतील त्या नाहींशा व्हाव्या हाच आहे. व हा उद्देश पूर्णपणें सिद्धीस जावा ह्मणूनच वरच्या सर्व गोष्टी आमच्या पूर्वजांनीं काढिल्या आहेत जोर काढिल्यानें अंगात ताकद उत्तम येते पण मांड्या जशा भराव्या तशा भरत नाहींत. याकरितां ऊठबशा आहेत कीं त्यांच्या योगानें मांड्या भराव्या. आणि त्यांस स्वळकटी यावी. तसेंच हातांस जोर येण्याकरितां मुद्गल पेहलणें आहे. व शरीर तरतरीत रहावें अशाकरितां बोथाट्या वगैरे दुसऱ्या कसरती आहेत. याप्रमाणें व्यायामाबद्दल पूर्वी फार बारकाई, असे व हल्लींही हा प्रकार चालू आहे. पण त्याची व्यायामांत गणना न करितां व्यायामाची चाल परद्वीपस्थांपासून आह्मी घेतली आहे. असें—राज्यकर्त्यांचें तेवढें चांगलें (मग तें कसें का असेना!) असें ह्मणणार ह्मणतात. याहीपेक्षां मुलांच्या खेळाचें उदाहरण उत्तम आहे. बालपणीं मुलांचें मन खेळांत विशेष असतें. तोच खेळाचा खेळ होऊन व्यायामही होतो. वरील दोन्हींही उदाहरणांपेक्षां "शतपावली" हें उदाहरण आमच्यांत ही चाल प्राचीनपासून आहे अशाविषयीं बळकट पुराव्याचें आहे. याच शतपावलीचा अर्थ काय आहे? व्यायाम. या उदाहरणावरून पूर्वी ही चाल आमच्यांत होती इतकेंच नव्हे तर ती आह्मांत अगदीं बाणून गेली होती असें सिध्ध होतें. याविषयीं आधार खालील दोन श्लोक आहेत. ॥ आतापीभक्षितोयेन वातापीचनिपातितः ॥ समुद्रःशोषितोयेन समेगस्त्यःप्रसीदतु ॥१ ॥ आतापीभक्षितोयेन वातापीचमहाबलः ॥ अगस्त्यस्यप्रसादेन भोजनं ममजीर्यतां. ॥ अगदीं प्रचारांतील एक ह्मण आमच्यांत आहे तिजवरूनही लक्षांत येईल. एखाद्या मनुष्यास भूक लागेनाशी झाली ह्मणजे त्यास घरांतील मंडळी सांगते जा अमळ बाहेरून फिरून ये. तेव्हां याचें बीज तरि काय असावें बरें! व्यायाम "विविधज्ञानविस्तार" नामक मासिकपुस्तकांतील आज्ञापत्र [ सवाई माधवराव पेशवे यांस त्यांची आई गंगाबाई इणें केलेला उपदेश ] ज्यांणीं वाचिलें असेल त्यांनां त्याच आज्ञापत्रांत व्यायामाचा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख केलेला आहे असें आढळलें असेल. दुसरी गोष्ट पटवर्धन ह्मणून दक्षिणेंतील प्रख्यात घराणें सर्वांस महशूर आहेच. त्यांतील सर्वच पुरुष लष्करी कामें करीत होते असें नाहीं. तरी त्या घराण्यांत अशी चाल असे कीं ज्यास सर्व युद्धकला पट्टा खेळणें, बंदुकमारणें वगैरे अवगत असतील त्यानेंच मांठमोठे जे योध्दे ( परशुरामभाऊ सारखे ) यांच्या पंक्तीला बसावें. ज्यांस त्या अवगत नाहींत त्यांनीं बसूंनये असा सक्त निर्बंध असे. असो याप्रमाणें आणखीही पुष्कळ उदाहरणें आहेत. पण तीं सर्व दिलीं असतां निष्कारण पाल्हाळ होणार आहे व जीं दिलीं आहेत तीं निवडक आहेत. ह्मणून तेवढींच बस आहेत. ( पुढें चालू. )

---

A meeting was held on the 6th instant in the Anglo-vernacular school at 5 P. M. Almost all the Native Government officers, Vakeels, the Barister and the Editors attended, and Mr. Bhaskar Sukharam was called to the chair. Then Mr. Khaparde being requested, rose and said to the following effect.

Mr. Chairman, gentlemen and friends, In a place where a learned orator like Mr. Laxmipati Naidu, has spoke, for a man like me to rise and adress, is a dfficult task, nay, a hazard and I would not attempt it, but that I feel that I am undergoing a kind of examination. This is the public which has seen me a schoolboy, has awarded prizes to me, in my school examination and it is this public now that must see how I have been doing at College. On an occasion like this there is one whom we all miss. It is Doctor Sinclair I allude to, the father of education in Berar, as I say this, his magestic figure the venerable beard and paternal smile, are all present to my mind and it is with great effort that I suppress my feelings of deep sorrow at his premature death. I need not say it was he, first, who introduced higher kind of education here, and fortunatly, I am speaking this evening about the same.

The Subject is "General education, and the duty of educated men in Berar." About the former part of my subject, I will content myself with giving a very brief, and therfore necessarily, imperfect sketch. Doctor Sinclair, in his great wisdom, retained the old way of first putting the young student on elementary arithmetic, which we call Ujalani. Then he is introduced to the "Seed of science" and grammar. This secured him all the advantages acquired from exercising the mind, both to abstract reasonings and concrete considerations. After this, comes that portion of education, in which he must make his acquaintance with the elements of a few sciences, and the rudimentary books of the English tongue. Gradually now he passes from one standard to another, learns to leap in an awkward way and at last gets through the matriculation examination of the University of Bombay, as the completion of his High School career. This is all that is done in Berar, and the rest is done by the affiliated Colleges at Poona and Bombay Now it will be seen from this rough picture that little or no attention is paid to the physical education of the student, in the lower and middle class schools, and though the High school attempts to do something, it is in my opinion, too little to meet the wants of the students. Further, it might be seen, that nothing of common life is taught to him and so when he finishes his school course, and enters the world, he is nothing more than a schooled simpleton, and an ignorant man in every thing else. These defects Doctor Sinclair came too late to supply, and I learn with great gratification, that the present authorities, are working in the direction of remedying them and this much, for the present about this part of my subject.

For the next, it will be better, or atleast convenient to consider the following two questions and propose answers to them. The first would be "How should he behave ?" and the other "what should he do?" Now we shall consider the former.

In a society like ours, mixed in race and religion we shall see the difficulty of moving on the part of a young person just out of his college. There are, on the surface, three distinct nations, the Hindoos, the Mahomedans, the Parsees, above these there is a fourth, the English, separated from all the three, by religion & opinions, as they are among themselves. Then the two first are divided into the reformers & the orthodox, which of these two sides is our young collegiate to take? His breeding generally inclines him to the former, but there is a majority on the side of the latter. Here he is puzzled. Then some would think he should keep with both, be an orthodox outwardly and a reformer at heart. This is evidently telling him to be a hypocrite, and a man of double dealing. Then what other can we propose ? I think it would be proper for him to do what he thinks best, that is right and conducive to the good of the society and leave the consequences to follow. In some cases—why in many—it might demand some sacrifice, and there might be many who are perfectly unwilling to make any,—then for these, I confess, I have no answer, whereas for the others who are prepared to lose now, for future gain,—and there are not many of these— for them I say I have given the answer.

The other question is rather easy to discuss, what the educated man should do is evidently the good of his country and for this, he must try to promote unity encourage native industry, and spread education. These are high aims, and would appear difficult to accomplish but you must remember, that nothing will be attained if nothing be attempted. So for this one should begin by endeavouring to establish small friendly clubs, such as would promote intercourse among the individual members, and then try to unite these clubs to form a higher and larger assembly and thus aspire to be one, though a feeble one of that company of patriots who have devoted their laborious lives to the prosperity and wellbeing of their country.

I am afraid I have been keeping you too long, and will therefore close, with the prayer that my superiors--and my masters are here--will find amusement and my equals who are all here will find some pleasure if not instruction.

---

## वऱ्हाड

काल रात्रौ टौनहालांत दुष्काळपीडितांस सहाय करण्याकरितां सभा भरली होती तिची सांद्यंत हकीकत पुढें लिहू. मे. दस्तुर बहिमनजी साहेब यांणीं त्या कामीं फार चित्त पुरविलें त्यामुळें सभेस लोक थोडेच जमले होते तरी रकम ११२२ रुपये झाली व दरमहा वर्गणीचे अंक सुमार ७४ रुपयांचे पडले. दस्तुर साहेबांनीं २०१ रुपये दिले व दरमहा २५ रुपये वर्गणी कबूल केली त्याचप्रमाणें. शेट गंगाधर जोरावरमल व रा. रा. देवराव विनायक वकील व रा. रा. पांडुरंग गोविंद वकील यांणीं प्रत्येकी १०१ रुपये दिले. यावरून आणखी कित्येक सभा होतील व ही रकम पुष्कळ वाढेल असें वाटतें. ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

---

रा. रा. परशराम सखाराम गुप्ते माजी क्लार्क आफ धि कोर्ट उमरावती यांचे विषयीं रेसिडेंट साहेबांनीं अखेर ठराव केला कीं, ते सर्व दोषांपासून मुक्त आहेत व त्यांस त्यांची पहिली जागा मिळणें योग्य आहे परंतु त्यांच्या वर्तणुकीच्या संबंधानें जे संशय उत्पन्न झाले आहेत त्यांवरून त्यांस वऱ्हाडांत जु० खात्यांत जागा न देतां दुसऱ्या कोणत्या खात्यांत द्यावी. व ते रिकामे झाले आहेत तेव्हांपासून त्यांस अलाबन्स मिळावा. त्यावरून कमिशनर साहेबांनीं विद्याखात्यांत त्यांस जागा देण्याविषयीं डायरेक्टर साहेबांस लिहिलें आहे. वपरशरामराव त्या उद्देशानें खामगावास गेले आहेत. या संबंधानें पुढील खेपेस आह्मी विशेष लिहू.

---

भानगडीच्या सेशन मुकदम्यांत कोणी युरोपियन असिस्टंट कमिशनर प्रासिक्युटर नेमित जावा असा ठराव झाला आहे असें आमचे उमरावतीकर एक मित्र लिहितात.

---

कर्नेल नेंभार्ड साहेब कमिशनर उदईक हैदराबादेकडे जाणार असें वर्तमान आहे.

---

ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपालची जागा अजून भरली नाहीं.

---

डिपुटी कमिशनर मे. हडलस्टन सा० शनिवारीं एथें येतील.

---

एक्झिक्युटिव इंजिनियर मि० हामिलटन साहेब रजेवरून परत आले.

---

क्या. बुलक साहेब रजेवरून परत येऊन उमरावतीस आपले कामावर रुजू झाले.

---

मौलवी जहरूदीनचे बंधू यांस वऱ्हाडांत वकिली करण्याची परवानगी मिळावी ह्मणून मुसल्मान लोकांच्या सभेनें जुडिशियल कमिशनर साहेबांस विनंती केली होती पण परवानगी मिळाली नाहीं असें ऐकतों.

---

## वर्तमानसार

इंदुरास कापसाची एक नवीन गिरणी आणून सूरू केली आहे.

फ्रान्सदेशचे लोक आपलें बल वाढविण्याची खटपट करूं लागले आहेत. त्यांनीं पारीस शहरच्या सभोंवतीं २५ किल्ले नवीनें बांधले. त्या देशांत विजेचा एक प्रकारचा नवीन दिवा शोधून काढिला आहे. त्याचा प्रकाश फार उतम पडतो. दिल्लीचे दरबारास ते दिवे येणार आहेत असें ह्मणतात.

अमेरिकेंत स्वतंत्र संस्थानांत प्रेसिडेंटची नेमणूक दर च्यार वर्षांनीं निवडणुकीनें होत असते ती गेल्या आठवड्यांत होणार होती. गेल्या दोन खेपा ह्मणजे आठ वर्षें जनरल ग्रांट साहेब हेच प्रेसिडेंट होते. ह्मणजे त्यांचीं पहिलीं च्यार वर्षें भरल्यावर त्यांनांच पुन्हा लोकांनीं निवडिलें. व आतां तिसऱ्यानेंही पुन्हा त्यांनां निवडतील असें ह्मणतात.

मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीला सरकारानें ४२ लक्ष रुपये कर्ज दिलें. व पहिलें कर्ज आहे तें मिळून दर सहा महिन्यांनीं एक हप्ता अशा ६० हप्त्यांनीं फेड करण्याचा ठराव झाला. हप्ता १७८००० रुपयांचा.

## युरोपांत घोर युद्धसंग्रामाचा प्रसंग.

आजपर्यंत इंग्लंड व रशिया टर्कीच्या संबंधानें आडपडद्यानें बोलत किंवा करणें तें करित असत; परंतु आतां प्रकरण अगदीं नेटावर आलें. रशियानें प्रथम आस्ट्रियाच्या बादशाहास टर्कीचा कांहीं भाग घेण्याविषयीं पत्र पाठविलें. याजवरून लार्ड डर्बी यांनीं रशियाच्या इंग्लंडांतील वकिलास हें गैर आहे ह्मणून सुचविलें असें लंडनच्या ता० ११ नोवेंबरच्या तारेवरून समजतें. त्याप्रमाणेंच रशियानें लढाईची महकुबी आपण पुढें होऊन निकरानें मागितली हाही प्रकार विलक्षण झाला. तारीख ९ रोजीं लार्ड बीकन्स फील्ड यांनीं आपल्या गिल्ड हालमध्यें भाषणांत स्पष्ट बोलून दाखविलें कीं, टर्कीमध्यें स्वस्थता व्हावी, व त्यांतील ख्रिस्ती लोकांची स्थिति सुधारावी असा आपला हेतु आहे त्याप्रमाणेंच टर्कीचें सर्व राज्य व स्वातंत्र्य कायम राहून पारिसचा तह जारी राहिला पाहिजे सारांश स्वस्थता राहावी अशी इंग्लंडची इच्छा विशेष आहे; तथापि स्वातंत्र्यास व राज्यास धक्का बसावयाची वेळ आल्यास आह्मी लढाईस तयार आहों. याप्रमाणें इंग्लंडच्या मुख्य प्रधानाचें बोलणें प्रसिद्ध झालें. त्याजवरून आजच्या इंग्रजी पत्रांत लंडनच्या ता. १२ च्या तारेवरून असें कळतें कीं ता. ११ रोजीं रशियाचे बादशाहा यांनीं मास्को एथें भाषण केलें त्यांत त्यांनीं स्पष्ट बोलून दाखविलें कीं हल्लीं कान्स्टांटिनोपल एथें युरोपांतील सरकाराच्या वकिलांची सभा भरलीं आहे तिचें ऐकमत्य व्हावें अशी आमची मनापासून इच्छा अहे; परंतु आमची बरोबर खात्री न झाली तर आह्मी अगदी स्वतंत्र रीतीनें वाटेल तसें करूं आणि तसें करण्यांत सर्व रशिया आह्मास मदत करील अशी आमची खात्री आहे. आतां या वरील दोन भाषणांच्या झोकावरून इंग्लंड व रशिया यांचा उघड सामना झाला आणि लढाईच्या महकुबीच्या सहा आठ वड्यांच्या मुदतींत स्वस्थतेचा सर्वानुमतें ठराव न होईल तर युरोपांत घोर रणसंग्राम माजणार यांत आतां अगदीं भ्रांति राहिली नाहीं. काय होतें कोण जाणें. ह्मणून सर्वांस मोठी काळजी उद्भवली आहे. आंत दुष्काळ व बाहेर लढाई, तेव्हां हा मोठाच चमत्कारिक प्रसंग समजला पाहिजे.

इं. प्र.

---

GREAT INDIAN PENINSULA REILWAY.
NOTICE.

ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे.

नोटिस.

DELHI ASSEMBLAGE—CHEAP RETURN TIKETS.

दिल्ली दरबार- स्वस्त रिटर्न टिकिटें.

जाहिर करण्यांत येतें कीं ह्या रेलवेच्या सर्व स्टेशनांवर दिल्लीस जाण्याकरितां जबलपुरपर्यंतचीं पहिल्या आणि दुसऱ्या क्लासाचीं स्वस्त रिटर्न टिकिटें देण्यांत येतील व असें टिकिट घेणाऱ्या प्रत्येक मनुष्यास जबलपुरास जाऊन परत येण्याचें तिसऱ्या क्लासाचे नोकराचें टिकिट मिळण्यास हक्क आहे. हीं टिकिटें येत्या दिसेंबर महिन्याच्या पंधराव्या तारखेस व मध्यतरीं मिळतील व तीं येत्या जानेवारी महिन्याचे पंधरावे तारखेस व त्यापूर्वी कोणत्याही दिवशीं परत येण्यास उपयोगीं पडतील व जाण्या येण्या बद्दलच्या ह्या टिकिटांस फक्त जाण्याच्या टिकिटांच्या सवापट किंमत पडेल.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ४ माहे जुलै
सन १८७६ इसवी.

---

READY FOR SALE
the
CODE OF CIVIL PROCEDURE.
BEING
Acts VIII of 1859 and XXIII of 1861, with decisions

Contained in the Bombay High Court and the Indian Law Reports, from 1862 to the end of August 1876. Priee Rs. 2—8, if paid before the 1st October next, and Rs. 3 afterwards. For outsiders annas 4 in addition for postage. Books sold will bear the signature of either of the undersigned. Apply to

GUNGAHUR V. LIMAYE
Pleader, Shunwar Peit.

PANDURANG BACHAJEE
Pleadar, near Panjarpole.

Poona
1st Sept. 1876

N. B. A. Digest of cases on Hindoo and Mahomedan Laws and the Indian Succession Act, is under preparation.

---

जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

खामगाव तारीख १४ माहे सप्टेंबर सन १८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent

---

नोटिस
जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.
लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावे कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासिंजर ( उतार करू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................... १ रुपया
नेटिव लोक .... .............. ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

धाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

---

जाहिरात.

उमरावती वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून देण्यांत येते कीं, येत्या दिसेंबर महिन्याचे २५वे तारखेपासून या मंडळीचा पुढें लिहिलेल्या विषयांत उमेदवारांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ सुरू होणार आहे. याजकरितां ज्या उमेदवारांची परिक्षेस येण्याची इच्छा असेल त्यांनीं लेखी अर्ज खालीं सही करणाराकडे प्रमोदसिंधु छापखान्याचे पत्यावर सदहू तारखे पूर्वीं निदान १५ दिवस पोंचतील असे पाठवावे.

"विषय पहिला— येत्या १८७७ जानेवारी महिन्यांत दिल्ली एथें महाराणीनें एम्प्रेस ( बादशाहीण ) हा किताब घेतला ह्मणून त्यांचे सन्मानार्थ दरबार भरणार आहे ते वेळेस राणीचे तिसरे चिरंजीव ड्यूक आफ् कानाट हे आले आहेत असें समजून ह्या देशाचें राज्य राणीनें आपले हातीं घेतल्यापासून ह्या देशाचें जें जें कल्याण झालें त्याचें संक्षेपानें यथार्थ वर्णन करून हल्लीं जीं आपलीं दुःखें आहेत तीं दूर करण्यासाठीं ड्यूक यांणीं राणी साहेबांची विनवणी करण्याबद्दल सूचना

विषय दुसरा— अमुक जातीचे लोकांनीं अमुकच धंदा करावा, दुसरा करूं नये असा आपले देशांत प्रतिबंध असल्यामुळें आपले देशांत तोटे झालेले आहेत त्यांचें वर्णन करून आज कोणत्याही जातीस कोणतेही प्रकारचें शिल्प काम करण्याची इच्छा झाल्यास त्यास प्रतिबंध नाहीं. असें स्थापितें करण्यासाठीं सुयुक्तिक साधारण उपदेशपर भाषण करणें.

विषय तिसरा— औरंगजेब बादशहानें शिवाजी राजावर राजा जयसिंग आणि दिलीपखा या दोघांस स्वारी करण्यास पाठविलें त्या वेळचे मराठ्यांचे आणि मुसलमानांचे स्थितीचें थोडक्यांत वर्णन करून त्या बरोबर लढाई करण्यासाठीं शिवाजीचा सेनाधिपती असें बोलणारानें आपण समजून शिवाजीच्या सरदारांस आणि सैन्यास आवेश व धैर्य येई अशा रीतीनें उद्देशून संभाषण करणें.

येणेंप्रमाणें ३ विषय नेमिले आहेत त्याप्रमाणें पहिल्या विषयांत पहिलें बक्षीस ३० रुपयांचें व दुसरें १० रुपयांचें. दुसरे विषयांत बक्षीस २५ रुपयांचें व तिसरे विषयात २० रुपयांचें याप्रमाणें ४ बक्षिसें दिलीं जातील.

परिक्षेस येणारे उमेदवारांनीं समारंभाचे पूर्वींचे दिवशीं चिटणिसांस भेटावें.

उमेदवारांस लागू असण्याचे नियम खालीं दिले आहेत त्यांकडे त्यांनीं अवश्य लक्ष द्यावें.

१ उमेदवारानें उभें राहून भाषण करावें. व जवळ लेखी टिपण बोलतेवेळीं ठेवूं नये.

२ प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूं नये. परंतु जरूर वाटल्यास भाषण करणारास अर्ध्या तासापूर्वीं रजा देण्याचा व वाटल्यास मुदत अधिक एक तास पर्यंत वाढविण्याचा अधिकार परिक्षकांस आहे.

३ ज्या उमेदवारांचे निरनिराळे विषयांत अधिक गुण लागतील त्या उमेदवारास पहिलें इनाम व त्याच्या खालोखाल ज्याचे लागतील त्यास दुसरें इनाम दिलें जाईल. परंतु एक तृतियांशापेक्षां कमी लागल्यास मुळींच इनाम दिलें जाणार नाहीं.

४ सन्मानार्थ नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर कोणाची भाषण करण्याची इच्छा असल्यास त्यास परवानगी आहे. उमरावती तारीख ९ आक्टोबर सन १८७६ इसवी.

यशवंत गोविंद सातारकर
सभेचे चिटणीस.

---

हे पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० २६ माहे नोवेंबर सन १८९६ इ० अंक ४७


## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.



## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्रजी लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |


## दुष्काळ पीडितांच्या सहायार्थ सभा.

अकोल्यास तारीख १८ माहे नोवेंबर शनिवार रोजीं सायंकाळीं सभा झाली. सर्व युरोपियन व नेटिव लोकांस पाचारण केलें होतें. पण युरोपियन कोणीच आले नव्हते, व नेटिवही थोडे आले होते. कांहीं बाहेर गावीं गेले असल्यमुळें व कांहींकांस वेळ न फावल्यामुळें कमी लोक सभेस हजर होते, सभेचें काम सुरू होण्याच्या सुमारास मि० नौलिस साहब स्मालकाज जडज, व मि० डेविस साहेब कोन्सी आफिसर यांच्या चिठ्या आल्या कीं कांहीं अडचणीमुळें येणें होत नाहीं. सभेचें काम चालू द्यावें तें आह्मांस संमत आहे. नंतर सभेचें काम सुरू झालें. मे० दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं अध्यक्ष व्हावें अशी सूचना झाली व तिला संमती मिळाली तीप्रमाणें ते अध्यक्षस्थानापन्न झाले. नंतर त्यांनीं थोडक्यांत च्यार मार्मिक व सरस शद्बांनीं सभेचा हेतु सांगितला. व याहून सविस्तर रा. रा. खंडेराव बाळाजी फडके हे कळवितील असें सांगून ते खालीं बसले. मग फडके यांनीं "दुष्काळग्रस्त लोकांची हल्लींची स्थिति" यावर भाषण केलें. नंतर एका मागून एक खालीं लिहिलेले ठराव झाले. दरएक ठरावाची सूचना करणारांनीं व त्यांस पुष्टीकरण देणारांनीं थोडथोडीं भाषणें केलीं त्यांत रा. रा. विष्णु मोरेश्वर मास्तर एम ए., रा. रा देवराव विनायक वकील, रा. रा. भास्कर महेश्वर तहशिलदार, रा. रा. रामचंद्र आबाजी मास्तर यांचीं भाषणें सुरस व वर्णनीय होतीं. व तेणेंकरून लोकांचे मनावर चांगला प्रभाव झाला. नंतर ठराव झाले ते:—

### ठराव.

१ मुंबई इलाख्यांत कांहीं जिल्ह्यांत दुष्काळ पडला आहे त्याचे निवारणार्थ वऱ्हाडांतून कांहीं तरी मदत व्हावी हें उचित आहे.

२ अकोले एथें आणि वऱ्हाडांत होतील तितक्या ठिकाणीं सभा भरवून वर्गणी जमवावी आणि त्या पैशाचें धान्य खरेदी करून दुष्काळाचे प्रांतांत पाठवावें.

३ या कामासाठीं एक जनरल कमिटी व एक म्यानेजिंग कमिटी असावी. जनरल कमिटींत खालीं लिहिलेले सभासद असावे.

अध्यक्ष

मे. हडलस्टन साहेब डिपुटी कमिशनर

उपाध्यक्ष

मे. दस्तुर बहिमनजी साहेब

सभासद

डाक्टर लिटल साहिब
मिस्तर नौलिस साहेब
,, डेविस साहेब
,, दस्तुर एदलजी साहेब
रा. रा. भास्कर सखाराम जयवंत
रा. रा. सखाराम मोरेश्वर
,, ,, विष्णु मोरेश्वर महाजनी
,, ,, भास्कर महेश्वर
,, ,, वामन कृष्ण देशमुख
,, ,, निळकंठ नारायण भट
,, ,, रामचंद्र आबाजी पन्हाळकर
मिस्तर शापुरजी शेट
,, असाजी शेट
रा. रा. वेणु गोपाळ मुदलियार
,, ,, कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुध्ये
,, ,, गोपाळ महादेव भिडे
,, ,, पांडुरंग दामोदर दवणकर
,, ,, विश्वनाथ नारायण दाढेकर
,, ,, पांडुरंग गोविंद वकील
,, ,, आपाजी खंडेराव वकील
,, ,, देवराव विनायक वकील
,, ,, सदाशिव नारायण वकील
,, ,, आपाजी शामराव वकील
,, ,, रामचंद्र धोंडदेव स्टेशनमास्तर
मिस्तर महमद इस्मायल
रा. रा. वासुदेव सदाशिव पितोळकर
,, ,, धोंडो बाळकृष्ण देव
,, ,, सदाशिव विष्णु भागवत
,, ,, बाळकृष्ण पांडुरंग
,, ,, अप्पा कानु डाक्टर
,, ,, श्रीकृष्ण मेंगाळ
,, ,, बापुजी यादव
,, ,, खंडेराव बाळाजी फडके
,, ,, नागो रघुनाथ मोहोळकर
,, ,, रामजी शाळिग्राम
,, ,, बाळकृष्ण काशिनाथ
शेट गंगाधर जोरावरमल
,, बनशीलाल मुकुंदलाल
,, कादरभाई
,, रघुनाथ रामप्रताप
,, हजारीमल
,, टिकमदास ताराचंद
मिस्तर पेस्तमजी शेट
,, सिलीमखान
,, जोरावर खान

म्यानेजिंग कमिटींतील मेंबरांचीं नावें.

अध्यक्ष

मे. दस्तुर बहिमनजी साहेब

उपाध्यक्ष

मि. डेविस साहेब

सभासद

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी
,, ,, वेणुगोपाळ मुदलियार
,, ,, पांडुरंग गोविंद वकील
,, ,, सदाशिव नारायण मुंबईकर वकील
शेट गंगाधर जोरावरमल
मि. असाजी शेट
,, शापुरजी शेट
,, पेस्तमजी शेठ
,, सिलीमखान

सेक्रेटरी

,, ,, खंडेराव बाळाजी फडके
,, ,, भास्कर महेश्वर लेले

खजिनदार

,, ,, देवराव विनायक वकील

४ दुष्काळ पीडित प्रांतांतील कलेक्टरांनीं इकडून गेलेला पैसा खात्रीनें पतकरण्याचा जिम्मा घेतला तर म्यानेजिंग कमिटीनें आपल्या प्रांतांत कांहीं पैसा उसनवार ह्मणजे बिनव्याजानें कर्जाऊ काढावा आणि त्याचें धान्य खरेदी करून तिकडे पाठवीत जावें.

५ त्याप्रांतांतील गरीब लोक अन्नाचे शोधार्थ इकडे आले असतील किंवा येतील त्यांस या सभेनें मदत करावी.

६ वऱ्हाडांतील धान्य त्याप्रांतांतील लोकांस निकत न्यावयाचें असेल व त्याकरितां तिकडील मंडळ्या अगर कोणीही या सभेस धान्य खरेदी करून पाठविण्याची मदत करावी अशाविषयीं लिहितील व पैसे पाठवितील तर म्यानेजिंग कमिटीनें तें धान्य घेऊन पाठविण्याविषयीं होईल तितकी सर्व प्रकारें तजवीज करावी.

७ जनरल कमिटी दर महिन्यास एकदा भरावी. व म्यानेजिंगकमिटी दर आठवड्यास शनिवारीं भरावी. कारण पडेल तर तीन मेंबरांचे सूचनेवरून मध्येंही म्या० कमिटी भरावी. जनरलकमिटीचें काम चालण्यास निदान १० व म्यानेजिंगकमिटीचें काम चालण्यास निदान ५ मेंबर हजर असावेत.

८ म्युनिसिपालिटीचे व्हाईस प्रेसिडेंट यांस म्यानेजिंग कमिटीनें विनंती करावी कीं या सभा भरण्याकरितां टौनहाल, आणि लिहिणें, वसूल करणे वगैरे कामाकरितां कमिटीचे कारकून व शिपाई यांची मदत मिळावी.

९ या सभेची प्रसिद्ध पत्रें वऱ्हाडांतील मुख्य मुख्य ठिकाणीं पाठवून तेथेंही अशा सभा भरविण्याविषयीं तजवीज करावी. तसेंच या सभेचा उद्देश दुष्काळाच्या मुलखांत कळावा ह्मणून तिकडेही प्रसिद्ध पत्रें पाठवावा.

१० या सभेनें योजिलेले सर्व उद्देश बरोबर रीतीनें सिद्धीस जाण्याकरितां ज्या तजविजी करणें योग्य दिसल त्या त्या करण्याचा म्यानेजिंग कमिटीस अधिकार आहे.

११ या सभांची वेळोवेळ हकीकत होईल ती एथील वर्तमानपत्र कर्त्यांनीं प्रसिद्ध करण्याविषयीं त्यांस विनंती करावी.

### विशेष ठराव.

याच कामा करितां तारीख २१ बुधवार रोजीं जनरल कमिटी पुन्हा भरली होती. तींत पुष्कळ सूचना व त्या संबंधानें भाषणें होऊन शेवटीं सर्वानुमतें ठराव झाला तो असा:—

पहिले सभेंत झालेल्या निश्चयांत प्रधान काम हें गणिलें होतें कीं मुंबई इलाख्यांत विपत्तिग्रस्त लोकांस द्रव्य अथवा धान्य पाठवून सहाय करावें. आणि या सभेचा मुख्य उद्देश हा होता कीं दुष्काळानें पीडिलेल्या प्रांतांतून जे लोक इकडे आले आहेत व येत आहेत आणि तिकडील दुष्काळ निमित्तानें या प्रांतांतही अतिशय महर्गता झाली आहे. व त्यामुळें दुष्काळ गोर गरीब आणि मजूर लोक हलाखींत आले आहेत व आणखी येतील याजकरितां प्रथम इकडील लोकांस मदत करावयाची हेंच या सभेचें प्रधान काम समजावें आणी नंतर सवड होईल तशी बाहेर गावीं मदत पाठवावी असें ठरलें.

या सभेंत आणखी अशी सूचना झाली कीं विपत्तिग्रस्त लोक काम करण्यामाफक असतील त्यांपासून काम घेऊन त्यांस मजुरी द्यावी. व तें काम या मुख्य ठिकाणीं पाण्याचें दुर्भिक्ष्य आहे तें नाहींसें करण्याचें असावें. ह्मणजे पैशाचा योग्य विनियोग, विपत्तिग्रस्तांस सहाय्य, आणि सर्वोपयोगी व स्थायीक महत्कृत्य इतक्या गोष्टी यांत घडून येतील. व लोकांचा जितका पैसा जमेल तितकाच आणखी पैसा सरकारांतून अशा कामास मिळत असतो तो मिळेल व तेणेंकरून लोकांस दुप्पट मदत मिळेल.

ही सूचना सर्वांस पसंत होऊन बिनतक्रार कबूल झाली. व आणखी असें ठरलें कीं मागचे सभेस रकम देणारांपैकीं हजर नसलेले लोकांत कोणाचा याहून अन्य विचार असेल तर तो त्यांनीं सभेस कळवावा.

पहिले बैठकीस तारीख १८ नोवेंबर रोजीं लोकांनीं जें सहाय दिलें तें असें:—

| नावें | देणगी | महिना वर्गणी |
|---|---|---|
| मे. दस्तुर बहिमनजी साहेब | २०१ | २५ |
| मि. असाजी होशंगजी | २५ | ५ |
| मि. एदलजी बहिमनजी | २५ | ५ |
| रा. रा. भास्कर महेश्वर लेले | ५१ | ३ |
| ,, विष्णु मोरेश्वर एम. ए. | २५ | ३ |
| ,, पांडुरंग गोविंद वकील | १०१ | ३ |
| ,, देवराव विनायक वकील | १०१ | ३ |
| ,, निळकंठ नारायण भट | २१ | २ |
| ,, खंडेराव बाळाजी फडके | २६ | २ |
| शेट गंगाधर जोरावरमल | १०१ | ३ |

| | | |
|---|---|---|
| मेसर्स बमनजी छकडजी आणि कंपनी | ५१ | २ |
| मि. सिलीमखान | ५१ | २ |
| ,, नोरावर खान | ५ | ० |
| शेट टिकमदास ताराचंद | २५ | २ |
| ,, रघुनाथदास रामप्रताप | २५ | २ |
| ,, हजारीमल | २५ | २ |
| मि. हुसेनखा | २० | १ |
| ,, आगासबेग | ५ | ४ |
| नवाब मीर यावरअलीखान बहादुर जहागिरदार | ५१ | ० |
| रा. रा. सखाराम महादेव | १५ | ० |
| ,, राघो यादव | १० | ८ |
| ,, परशराम गणेश | ५ | ८ |
| ,, मोरो रावजी | १० | ८ |
| ,, मुकुंद बाळकृष्ण | १५ | १ |
| ,, सदाशिव नारायण | १० | ८ |
| ,, रावजी घन:शाम | ५१ | ८ |
| ,, रामचंद्र आचार्जी पन्हाळकर | ५ | १ |
| ,, तात्याजी बळवंत | ५ | ० |
| ,, नारायण रामचंद्र आलमेलकर | ५ | ० |
| ,, जयकृष्ण केशव देशपांडे | १० | १ |
| मि. चांदखा व कालेखा | १० | ४ |
| रा. रा. विष्णु सिताराम बादवडकर | ५ | ४ |
| ,, गणेश राजाराम पाटील पातुर नंदापुर | ५ | ८ |
| ,, रामजी रावजी पाटील पातुर नंदापुर | ५ | ० |
| ,, धोंडो बाळकृष्ण देव | २ | ८ |
| ,, विश्वनाथ मोहनीराज | ३ | ० |
| ,, विष्णु आत्माराम | २ | १ |
| ,, विठू नारायण | २ | ० |
| ,, हरीभाऊ विनायक | १ | ४ |
| ,, माधव रामचंद्र | २ | ० |
| ,, वामन वासुदेव | ३ | ४ |
| ,, गणेश विष्णु खरे | १ | ० |
| ,, रामचंद्र नारायण | १ | ० |
| ,, बाळकृष्ण रामचंद्र | १ | ० |
| ,, गंगाराम विश्वासराव | १ | ० |
| ,, अंताजी रघुनाथ हुंडीवाले | १ | ० |
| ,, वामन बापुजी | १ | ० |
| मागाहून वर्गणीदार झाले ते:— | | |
| रा. रा. गोपाळ महादेव भिडे | २५ | २ |
| ,, पांडुरंग दामोदर दवणकर | २१ | १ |
| ,, सदाशिव नारायण मुंबईकर | ५१ | १ |
| ,, कृष्णराव हरी कोलटकर | ३५ | १ |
| ,, माधवराव विष्णु वकील | ५१ | १ |
| ,, केशव यादव वकील | ५१ | १ |
| ,, लक्ष्मण भास्कर वकील | २५ | १ |
| ,, नथो लक्ष्मण वकील | २१ | १ |
| ,, सदाशिव विष्णु भागवत | १५ | १ |
| ,, वेणुगोपाळ मुदलियार | ५१ | ५ |
| मि० महमद इसमायल | १० | ० |
| | १४७८ | |
| | | ८८-१२ |

या शिवाय विष्णु मोरेश्वर महाजनी यांणीं १०० रुपये कर्ज ऊ दिले.

## संकटाची सांगड.

परमेश्वराचे अवकृपेनें प्रस्तुत आमचे देशावर अनेक संकटांची धाड आली आहे व अधिकाधिक येऊं पहात आहे हा विच्यार मनांत येऊन फार दु:ख वाटतें. दक्षिणेंत मोठा दुष्काळ पडून लक्षावधि लोक संकटांत पडले. गुजरार्थेत मोठा पूर येऊन नद्यांना साठ साठ फूट पाणी चढून नर्मदेच्या पुलासारखे पूल वाहून गेले. महमारी वाईनें हजारो मनुष्यांचा ताडफाड बळी घेण्याचे काम गुदस्तपासून चालू ठेविलेंच आहे. हैदराबादेस आग लागून कियेक लक्षांचें नुकसान झालें ह्मणून नुकतेंच ऐकलें इतक्यांत बंगाल्याकडे वादळ होऊन कियेक गावांतून समुद्राचें पाणी तीस तीस फूट चढून बसाहतीचीं स्थळें केवळ प्रेतांनीं भरून गेलीं. मामलेदार, मुनसफ, फौजदार पोस्ट मास्तर, डाक्टर वगैरे सर्व एका गावीं दौलतगंज एथें निजल्या ठिकाणीं बायका मुलांसुद्धां जलसमाधिस्थ झाले. काय हा अनर्थ! इकडे मोठमोठ्या गावांतून दुष्काळग्रस्तांचे बच्यावाकरितां लोक पसा गोळा करित आहेत, आणि दिल्लीकडे ऐशआरामाची आणि संपत्ती नासून टाकण्याची कडेकोट तयारी चालली आहे. तुर्कस्थानचा राजा व ह्याचीच कांहीं प्रजा यांची लढायी चालली होती तींत आतां एका बाजूस इंग्लंड व दुसऱ्या बाजूस रशिया होणार अशीं वर्तमानावर वर्तमानें येत आहेत. आणि तीं खरीं झालीं असतां हिंदुस्थानास मोठाच संसर्ग लागणार आहे व यापासून आमचे स्वस्थतेस मोठी भीति आहे.

अशा अनेक प्रकारच्या संकटांच्या तांगडींत प्रस्तुत आमचा देश गडबडून गेला आहे तेव्हां त्यांतुन याचें सर्व प्रकारें संरक्षण करण्यास कृपाळु परमेश्वर मात्र समर्थ आहे त्यानेंच आह्मां दीनावर दया करून चांगला व आनंदाचा दिवस लवकर दाखवावा.

## THE ADMINISTRATION OF BERAR.

The annual administration reports of this Province show in detail the progress which has been made in all departments of government since it is assigned over to the British, & unquestionably improvements unparallel in the history of any country have been made from time to time so rapidly that Berar is not what it it was years before and it certainly promisses to be not what it will be in ten years to come provided the administration continues unchanged.

While we freely admit the incalculable benefits which the people of Berar enjoy under a well settled and admirably organized government, we cannot help drawing the attention of the authorities to certain matters which in our opinion as in the opinion of the public require an immediate reform.

In Berar the Officers are invested with revenue, civil, & magisterial works. They are expected to work in all branches of the Department, and although we admit that the Officers transact their works however multiferious and troublesome they may be, still it is impossible to expect that they could devote as much time as is indispensably necessary to go through such heavy work.

The introduction of the Small Cause Courts is no doubt a move in the right direction, but why, we may ask, so many Small Cause Courts should be maintained? we think one in Akola and one in Oomrawotee will suffice.

The changes introduced in the Civil Procedure Bill bring the Small Cause Courts also within the cognizance of the Judicial Commissionor's Court in as much as it provides for appeals being preferred from the judgments of the Small Cause Courts.

What we ask is the introduction of the system recently adopted in the Mysore Province and which we are glad to find is working very satisfactorily. The system we refer to is the establishment of the Munsiff's Courts.

If we are not mistaken this very system was very strongly advocated as the one best suited for Berar by Major Bell, the then officiating Judicial Commissioner who is now on leave and whose shortly expected return will be held with joy by all classes of people, but Mr. Saunders the then Resident under some peculiar circumstances allowed the matter to drop.

There is another point upon which we feel it our duty to say a word and that is the importance of employing qualified gentlemen for offices for which they may have received special training.

Indeed we have Military Officers in civil employment in Berar who are eminently qualified for the offices they hold, and we are not unconscious of the fact of the meritorious services rendered by these officers, namely, Colnol Nembhard, Colonel Allardyce, Majors Bell and Hudleston and Colnol Bushby, and we should at thesame time wish to see native gentlmen who have received superior training for the offices of magistrates and judges, share in the administration of the country equally with their European comrades.

We need hardly say that we echo the voice ofpublic in earnestly desiring to see native gentlemen of long experienceand standing in the service of Government, such as Tahsildars, Clerks of the Court and a few of the well known pleaders employed in the service of our Imperial Majesty the Empress of India.

This is one of the important subjects of which we feel confident due notice will be taken by the Local Government of this Province and if our wishes are fulfilled it will encourage us to treat upon other subjects of equal importance.

## वऱ्हाड

संकेताप्रमाणें कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर हैदराबादेस जाण्याकरितां सोमवारीं इकडून गेले. कर्नल अलार्डाइस साहेब जुडिशियल कमिशनर ही संकेताप्रमाणें मलकापुरास गाडींत बसून त्यांसमागें गेले. अकोल्याचे स्टेशनावर मे हडलस्टन सा. व मलकापुरचे स्टेशनावर कर्नल बुशबी साहेब कमिशनर साहेबांस भेट याकरितां मुद्दाम आलि होते. आठ दिवसांत त्यांच्या परत येणार असें कळतें.

बुलढाण्याचें सेशन जुडिशियल कमिशनर साहेब परत येईपावेतों तकूब राहिलें.

हैदराबादेस रेसिडेंट साहेबांचे संमतानें तुर्कस्थानचे लढायींतील जखमी झालेल्या लोकांस मदत करण्याकरितां बरीच मोठी वर्गणीची यादी झाली असें समजतें.

रा. रा. परशराम सखराम गुप्ते यांजविषयीं रेसिडेंट साहेबांचा ठराव झालेला आह्मी गेल्या अंकांत लिहिला आहे. आतां असें समजतें कीं कमिशनर साहेबांचे शिफारसिव्यावरून डायरेक्टर साहेब ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपालची जागा परशरामराव यांस देण्याविषयीं कबूल आहेत. मधल्या सस्पेंडीबद्दल कांहीं पगार व लवकरच ही जागा यांस मिळणार तेव्हां ही मोठी संतोषाची गोष्ट समजली पाहिजे. आतां पुरावा नसल्यावरून परशरामराव यांस रेसिडेंट साहेब निर्दोषी ठरवितात आणि त्यांची जागा त्यांस मिळावी असें मत देतात परंतु पुढें केवळ संशयावरून त्यांस जुडिशियल व रेविन्यु खात्यांत जागा मिळूं नये असें मत प्रदर्शित करितात ही मोठी दु:खाची गोष्ट आहे. संशयावरून एकाद्यास अशी शिक्षा देणें फार जबर आहे. संशयाचा फायदा न्यायाप्रमाणें ह्मटलें असतां ज्याविषयीं संशय उत्पन्न झाला त्यास मिळाला पाहिजे. कदाचित् संशय पक्के होते तर ठराव खरमरीत करावयाचा होता आणि संशय मळमळीत होते तर ते मुळींच जमेस न धरितां त्यांस त्यांनीं पेनशनास येईपर्यंत ज्या खात्यांत नोकरी केली त्यांतच त्यांस नोकरी करण्यास आणखी ६ महिने मोकळीक देते तर फार चांगलें झालें असतें. अस्तु. ६ महिन्यांच्या मुदतीनें डायरेक्टर साहेब परशरामराव यांस प्रिन्सिपाल नेमित आहेत असें ऐकतों तर ते आपले हुशारीनें, तत्परतेनें व परिश्रमानें उत्तम काम करून आपण या जाग्यास सर्वोपरी योग्य आहों असें डायरेक्टर साहेबांचे प्रचीतीस आणून देतील, व अधिक यांनीं काम केलें तर बरें असा त्यांचे मनाचा ग्रह करून देतील तर फार चांगलें होईल.

निजाम सरकारचे मुलखांत जे काखो लोक दुष्काळाच्या प्रांतांतून गेले आहेत त्यांस त्यांचा असा आग्रह आहे कीं घरें व जमीनी घेऊन स्थाईक व्हावें व देशाची

आबादी करावी. अहाहा! हा उद्देश किती चांगला व दयाळूपणाचा आहे! कांहीं लोक अशा करारानें तिकडे रहात आहेत व कांहीं त्यास नाकबूल होऊन माघारी परतत आहेत असें ऐकतों.

---

निजाम सरकार ८ वे तारखेस हैदराबादेहून दिल्लीस जाण्याकरितां निघणार असें प्रसिद्ध झालें आहे. पुण्यास यांचे ९ मुक्काम होतील. व पुढें शें दीडशें कोसांवर एकेक दोनदोन मुक्काम होऊन व्हाईसराय साहेब दिल्लीस येण्याचे सुमारास ते तेथें जाऊन दाखल होतील. त्यांना बसण्याकरितां सुंदर, सुशोभित, मोलवान, व सुखावह अशा रेलवेच्या एक दोन गाड्या स्टेट क्यारीयेजेस ह्मणून केल्या आहेत त्यांत बसून सरकार स्वारी जाणार अघाडीचें कांहीं कांहीं सामान रवाना झालें व दिल्लीस कांहीं सामान खरेदी होत आहे असें समजतें. तिकडून परत जातांना निजाम सरकारची स्वारी आपला वऱ्हाडप्रांत पहाण्यास येईल काय? आल्यास इकडील प्रजेस अत्यंत संतोष होईल. आणि बातमी चालू आहे त्याप्रमाणे वऱ्हाडप्रांत हस्तगत करून स्वारी येईल तर त्या यशास व लोकांच्या संतोषास पारावार नाहींसा होईल!

---

रा. रा. लक्ष्मीपति नायुडू बारिस्टर यांनीं आपले नोकरावर धमकी दिल्याबद्दलची फिर्याद केली होती व तिजबद्दल त्यास तहशिल्दार यांजकडून १० रुपये दंड झाला. गोष्ट ऐकण्यांत अशी आहे कीं धन्याचें व चाकराचें कांहीं कामाचे संबंधानें पटेना सबब तो आपले देशीं जाण्याकरितां रजा व खर्च मागू लागला व त्या संबंधांत शब्द दोन शब्द अधिक उणे दोहोंकडूनही झाले. हें खरें असेल तर एवढ्याकरितां बारिस्टर साहेबांनीं त्या गरिबावर फिर्याद करावयाची नव्हती. तसाच त्यास न्यायाधिकाऱ्याकडून दंडही सक्त झाला. गरिबास थोडाही दंड केल्यानें न्याय समाधान पावत नाहीं असें नाहीं. अस्तु. आह्मी असेंही ऐकलें आहे कीं त्या नोकराचे दंडाकरितां कांहीं मद्रासी थोर गृहस्थांनीं धर्मार्थ रुपये दिले व त्यास कैदेंत जाऊं दिलें नाहीं.

---

दुष्काळसंबंधानें त्यामुलखांतून इकडे आलेल्या गरीब लोकांस सहाय देण्याकरितां अकोल्याचे सभ्य गृहस्थांनीं जी खटपट केली व जें औदार्य दाखविलें त्याची सविस्तर हकिकत पहिले पृष्ठावर आहे त्याकरितां आह्मी एथील मंडळीची व त्यांत विशेषें मेहेरवान दस्तुर बहिमनजी साहेब यांची तारीफ करितों. व या कामाबद्दल याप्रमाणेंच आमचे थोर निष्पक्षपाती व नेटिवांचे अभिमानी टाइम्स आफ इंडियाचे एडिटर यांनीं बहिमनजी साहेबांची तारीफ केली आहे व यांचे प्रयत्नास यश इच्छिलें आहे

अकोल्यास पाण्याचें दुर्भिक्ष्य फार आहे सबब एक कोसावर उमरी एथें एक ताल बांधून तेथून पाणी आणावें किंवा डोनज ह्या गावच्या काटेपूर्णा नदीच्या डोहाचा फाटा जमीन खोदून एथील नदींत आणून सोडावा असा विच्यार आहे त्यांतून जें काम करणें ठरेल त्यावर तिकडून आलेले लोक मजूरीस लावावे व त्या कामीं हा जमलेला पैसा व सरकार देईल तो पैसा लावावा असा विच्यार आहे त्याप्रमाणें घडून ही गोष्ट निर्विघ्न पणें सिद्धीस जावो व अकोल्यास नळाच्या पाण्याचा लाभ होवो असें आह्मी सोत्कंठ इच्छितों.

---

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं मि० असाजी होशंगजी शेट, मे० दस्तुर बहिमनजी साहेब यांचे मामात, यांस निजामसरकारचे राज्यांत रिविन्युसर्व्हे खात्यांत असिस्टंटची जागा मिळाली व पुढें त्या खात्यांत असिस्टंटची जागा त्यांस मिळणार असेंही समजलें आहे. हे तरूण गृहस्थ हुशार, स्वभावानें चांगले व त्या कामांत वाकबगार आहेत.

---

मि. सी. भिमराव उमरावतीचे अव्वल जज यांस थर्ड क्लास माजिस्ट्रेटचे व दिवाणी ५० रुपयेपर्यंत काम पहाण्याचे अधिकार दिले.

---

ज्या पेवच्या जोंधळ्यांची दुर्गंधी येईल व त्यांच्या वासानें व भक्षणानें रोग संचार होईल. असे प्रकारचे जोंधळे बाजारांत येऊं देऊं नयेत व ते दुष्काळग्रस्तांचे हातीं जाऊं देऊं नयेत अशाबद्दल काळजीपूर्वक बंदोबस्त करण्या विषयीं तिकडील प्रांतांत सरकारी अधिकाऱ्यास सक्त हुकूम झाले आहेत. ही तजवीज अशा प्रसंगीं फार सावधगिरीची आहे. तरी सरकारानें त्याच हुकुमांत स्पष्ट सुचविलें आहे कीं तशा धाकानें किंवा फाजील बंदोबस्तानें व्यापारास धक्का बसून बाजारांत माल कमी येईल असें न होण्याविषयीं फार हुशारी ठेवावी.

याच संबंधानें आह्मी अकोल्याचे अधिकाऱ्यांस सुचवितों कीं येथील धान्याच्या व्यापारास त्यांच्या हुकमतीनें बरीच ढिलाई आली आहे हें मुख्य सरकारचे हेतू विरुद्ध आहे. सबब त्याकडे त्यांनीं एकवार कृपेचें लक्ष्य पुरवावें.

महामारीचे आजाराचे प्रसंगीं घाणीचे प्रतिबंधार्थ धान्याचा बजार नियमीत जागेवरून काढून फार दूर अव्यवस्थित जागीं नेला आहे तो पुन्हा गावांत आणून कापसाचे तगाचे ठिकाणीं ठेवणें फार अवश्य आहे व तसें झालें तरच व्यापार पुन्हा पूर्वस्थितीवर येणार आहे. सबब तसें अवश्य व्हावें अशी अधिकाऱ्यांस आमची आग्रह पूर्वक शिफारस आहे.

---

रा. रा. गोपाळ श्रीकृष्ण खापर्डे यवतमाळचे डिपुटी कमिशनर आफिसांत ४० रुपयांवर होते त्यांस इलिचपुरास नितक्याच पगाराची क्या मेकंजी साहेब तेथील डिपुटी कमिशनर यानीं जागा दिली. हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

---

दोन तीन दिवसांपासून थंडी कडक पडूं लागली आहे.

---

मि० लीवार्नर साहेब जे मागें येथें विद्याखात्याचे डायरेक्टर होते ते सिंध कराचीस अक्टिंग असिस्टंट कमिशनर झाले आहेत.

---

मलकापुर—तारीख २१ माहे नोवेंबर सन १८७६ इसवी.

या आठवड्यांत मलकापुरास एकच गर्दी होऊन गेली आहे, डिपुटी कमिशनर आले आहेत, व जु० कमिशनर आले होते तसेंच त्यांच्या संबंधानें अकोल्याचे नकीलही बरेच आले होते. इकडे या अधिकारी मंडळीची गडबड चालली आहे तों गावांतील मंडळीची गडबड उडविण्यास एथें एक नाटकही आलें आहे. तेव्हां एकंदर सर्व मलकापुरांत असाधारण चेतना उत्पन्न झाली आहे ह्मणण्यास हरकत नाहीं. इतक्यांत कालरोजी कर्नल नेभार्ड साहेब हैदराबादेस जाण्याकरितां येथें आले व त्याबरोबर जुडिशियल कमिशनर साहेब ही हैदराबादेस गेले. येथें कांहीं फौजदारी मुकदमे आहेत परंतु सध्या त्यांची चौकशी तहकुब राहिली आहे शिवाय नवीन कमिट केलेला एक फौजदारी खटला आहेच. हा पिंपळगावराजा एथें एका यवनीने बालहत्या केल्याबद्दलचा आहे असें ह्मणतात. त्या औरतीनें आपल्या नुकत्याच जन्मलेल्या पोरास पुनः नरकवासींच पाठवून दिलें. अस्तु सदरीं सांगितलेले नाटककार विख्यात इचलकरंजीकर हेत. या मंडळीचे मुख्य पात्रांत बराच फेरफार दिसतो. स्त्रीपात्रांची सर्व मंडळी नवीन आहे. परंतु या नाटकाचे हुशार सूत्रधार राघोपंत यांणीं त्यांस फार उत्तम रीतीनें तयार केले आहे. यांचे बुधवारीं व शनिवारी खेळ झाले. पुढचें कांहीं सांगवत नाहीं. बुधवारचा खेळ फारच उत्तम झाला. विशेषेंकरून नाच फार मनोवेधक होता. असो.

एथील डाक्टर जहिरूल हक्क यांची इलिचपुरास बदली होणार होती व हुकूमही झाला होता परंतु काय झालें समजत नाहीं. त्यांची प्रार्थना जबर खरी.

एथें आतां धान्याचा भाव बराच उतरला आहे. लोकांचीं दिलें पूर्वीं पेक्षां पुष्कळ सावध झालीं आहेत. तरीं बाहेर जाण्या करितां स्टेशनावर धान्याचीं हजारो पोतीं पडलेलीं दृष्टीस पडतात.

मे० डायरेक्टर साहेबांची स्वारी लवकरच एथें यावयाची आहे.

---

## वर्तमानसार

---

दिल्लीचे दरबारास राजे रजवाडे जाणार ते:—

हिंदुस्थान सरकारचे हिमतींतील:— निजाम, बडोदें, ह्मैसूर

मध्य हिंदुस्थान एजंटचे हिमतींतील:- शिंदे, होळकर, भुपाळ, रेवा, धार, दवास, दतिया जावरा, रतलाम, संदघर, चिकाटी, पन्ना, अजगड, बिजवर.

रजपूत संस्थानें:— मेवाड, जयपूर, जोधपुर, बंदी, केरोली, भरतपुर, टांक, किसनगड, अलवार, धोलपुर झालावर.

मुंबई सरकार:— खैरपुर, कोल्हापुर, कच्छ, इदर, भावनगर, पालनपुर, राजपिंपळा, राधनपुर, ध्रांगद्रा, छोटे उदेपुर, बारिया, लुनावाडा, बलसिनोर, सोथ, जंजीरा, जुनागड, सांवतवाडी.

मद्रास सरकार:—त्रावणकोर, कोचीन.

पंजाब सरकारचे हिमतींतील राजे १२

वायव्य प्रांत सरकारचे हिमतींतील राजे १०

मध्य हिंदुस्थानांतील राजे ज्यांना सलामी नाहीं व परतभेट नाहीं असे ४

राज्याधिकारी नसून मोठे सरदार, मानकरी वगैरे दरबारास बोलाविले ते:— बडोद्याचे १५, मद्रासचे ९, बंगालचे १७ वायव्यप्रांतचे ५९, अयोध्येचे ३८, नागपुरचे ११, ब्रह्मदेशचे १२ व ह्मैसूरचे १८.

जानेवारीपासून सपटेंबर पर्यंत ९ महिन्यांत ३१,५ ,००० रुपयांचें सोनें व २,१२,००,००० रुपयांचें रुपें हिंदुस्थानांतून बाहेर देशीं गेलें.

कलादगी जिल्हा रेलवेच्या सोईपासून फार दूर असल्यामुळें तिकडे बाहेरून धान्य जाण्याची मोठी पंचाईत झाली आहे. याजकरितां सरकार त्या जिल्ह्यांत धान्याचीं दुकानें घालणार-

बेळगाव, धारवाड, कोल्हापुर, व पटवर्धन संस्थानें इकडे मुंबईहून जलमार्गानें धान्य जातें.

डाक्टर आत्माराम पांडुरंग यांस मुंबईस पुढील वर्षाकरिता शेरिफ नेमणार.

रा. रा. नारायणराव वासुदेव ऊर्फ बाळासाहेब खारकर जे बडोद्याकडे नवसारीस व कडीपट्टण वगैरेकडे सुभे होते त्यांस नबानगरचे जामसाहेबांनीं आपले दिवाण नेमावे अशी शिफारस केली आहे व ती पोलिटिकल एजंट आणि मुंबईसरकार यांस मान्य झाली आहे असें समजतें. यावरून बाळासाहेब लवकरच दिवाण होतील.

जी आय पी रेलवे कंपनीस या दुष्काळापासून अतिशय फायदा होऊं लागला आहे. तिचें आठवड्याचें उत्पन्न सुमार अडीच तीन लाख असे तें गले आठवड्यांत सात लाख रुपये झालें.

कलकत्याहून मद्रासेस गेल्या आठवड्यांत ३ आगबोटी तांदूळ, गहू, व हरभरे यांच्या भरून गेल्या. त्यांत ५०००० पोतीं माल होता.

**औदार्य**—मद्रास इलाख्यांत कडापा एथें रा. रा नारायण रंगय्या चेटी यानावाच एक श्रीमान गृहस्थ आहेत ते दररोज २०० मनुष्यास अन्न घालीत आहेत. पहिल्यानें भात घालीत होते तो जेवणारांची संख्या ८००० पर्यंत वाढली मग कुळ ह्मणून धान्य आहे त्याची अंबील घालूं लागले आहेत. हा क्रम दोन महिने झाले सतत चालू आहे. हें औदार्य परम वर्णनीय होय.

सरकारानें लोकांची हजारों गुरें उपाशी मरत असलेलीं सह्याद्री बाजूला चरावयास फुकट नेलीं.

वायव्यप्रांताची एप्रिल तागाईत सपटेंबर अखेर सहामाही जमा २,८३,१३,४७० रुपये व खर्च ९३,९६,००० रु. झाला.

वायव्य प्रांतांत वकिलीचे परिक्षे करितां या वर्षी २००० उमेदवार आहेत.

सोलापुरास कलेक्टर साहेबाच्या मडम मिसेस ग्रांट साहेब यांनी विपत्तिग्रस्त लोकांच्या लहान मुलांस दूध पाजण्याचें छत्र घातलें आहे. त्यांत ३०० मुलें रोज दूध पितात. कित्येकांस मडम साहेब आपले पायावर घेऊन चमच्यानें दूध पाजितात. त्यांच्या त्या कृत्याकरितां महिना ५०० रु. वर्गणी जमली आहे.

सोलापुरास अनाश्रित लोकांकरितां अन्न छत्र घातलें आहे त्यांत ६००० लोकांस मिश्र अन्न मिळते.

## टर्की रशिया इंग्लंड व हिंदुस्थान

युरोपियन टर्कींतील बंड व्याचा लवकरच निकाल होऊन चहूंकडे शांतता होईल असें वाटत होतें, पण आतां ती सर्व आशा नाहींशी होऊन युरोपांतील शांतता नष्ट होऊन लवकरच बंडावा व मारामारी सुरू होण्याचें अगदीं नजीक येऊन पोंचलें. आतां कोणत्या घटकेस काय खबर येईल याचा भरवसा नाहींसा झाला. "सहा आठवडे लढाई तहकूब केल्याचें कबूल करा" अशी जी रशियानें टर्कीस धमकी दिली त्याचवेळीं भयकर स्थिति झाली, पण आतां तर त्यापेक्षांही निकरास येऊन पोंचलें. ता. १ रोजीं रशियाच्या बादशाहानें मास्को येथें स्पष्टपणें बोलून दाखविलें कीं, मोठाल्या राजांच्या मुखयारांची जी सभा भरत आहे "त्या सभेंत सर्वांचें एकमत व्हावें हें चांगलें, पण आपल्या मताविरुद्ध ठराव झाल्यास स्वतंत्रपणें आपण आपल्यामताप्रमाणें वागूं व रशियांतील सर्व लोक आपणास मदत करतील." तो ४८ तासांचा निरोप आणि हें भाषण हीं एकाठिकाणीं करून पाहिलीं म्हणजे आतां कोणाची पर्वा न करतां रशिया आपलें म्हणणें सिद्धीस नेण्यास तयार झाला असें होतें. आजपर्यंत रशिया व इंग्लंड हे पडद्याआड उभे राहून युक्ति प्रयुक्तीनें व कोटिक्रमानें टर्कीच्या संबंधानें रंगभूमीवर नाटकाचे प्रयोग करीत होते, पण तें पडद्याआड रहाणें आतां आटोपलें व दोघांचीही दृष्टादृष्ट होऊन आतां ते उघड रीतीनें एकमेकांस ओळखून एकमेकांविरुद्ध वागण्यास तयार झाले आहेत. यांत रशियाच्या मनांत टर्कीचें राज्य बुडवून तथील व काळ्या समुद्रावरील अधिपत्य आपल्या हातांत घ्यावें असून इंग्लंडास टर्कीच्या सुखदुःखाची जरी काळजी नाहीं तरी हिंदुस्थानांत येण्याचा रस्ता काळा समुद्र वगैरेंतून असल्यामुळें त्या रस्त्यावर एकट्या रशियाचा अंमल होऊं नये अशी इंग्लंडची इच्छा आहे. इंग्लंड व रशिया यांचें आज कित्येक वर्षांचें वाकडें असून तेव्हांपासून त्या वाकड्याचें मूळ कारण हल्लींप्रमाणेंच आहे. वीस चार वर्षांपूर्वी फ्रान्स व जर्मनी यांच्या लढाईच्या वेळीं रशियानें त्या समुद्रांत आपली सत्ता वाढविलीच, पण अद्याप त्या ठिकाणचे नाकेदार जे टर्की ते स्वतंत्र असल्यामुळें ती अडचणही काढून टाकण्याचा रशियानें हल्लीचा उद्योग चालविला आहे. एका रितानें सर्व भाताची परीक्षा करण्याप्रमाणेंच, युरोपांत जीं कांहीं मोठालीं म्हणून राष्ट्रें आहेत त्यांच्यांत किती पाणी आहे याची परीक्षा रशिया करून चुकला. युरोपांतील सर्व राजांचा सर्व साधारण असा एक तह असून त्यांत विनाकारण कोणी कोणाच्या वाटेस जाऊं नये व कोणी कोणाची आगळीक केल्यास त्या कामांत तिसऱ्यानें पडूं नये व पडल्यास आगळीक करणाराविरुद्ध व्हावें असा ठराव असतां टर्कीच्या ताबेदारांनीं बंडावा करण्याबरोबर त्या तहाप्रमाणें बंडवाल्यांस शासन करण्याचा उद्योग न करतां बंडवाल्यांस मदत करण्याचा क्रम रशियानें सुरू केला. रशियाच्या या अन्यायी वर्तनास इतर राजांनीं हरकत करणें जरूर होतें, पण ती कोणाकडूनही न झाल्यामुळें रशियानें सर्वांचें पाणी जोखलें व आतां उघड रीतीनें कुरघोडी करण्यास तयार झाला जर्मनी व आस्त्रिया यांस रशियानें कांहीं अंशीं आपल्या पक्षाचें केलें व बाकीपैकीं फ्रान्स तर आपल्याच काळजींत असून इटालीचें विचार करण्यासारखें सामर्थ्यही नाहीं; तेव्हां राहिलें काय तें इंग्लंड. आज कित्येक वर्षांपासून इंग्लंड मोठाल्या राज्यांत मोडत असून त्याणें कित्येक वेळ मोठाल्या लढायाही मारल्या आहेत. पण आलीकडे, हिंदुस्थानांतील अतिसंपत्तीच्या कारणानें इंग्लंडच्या आंगचें शूरत्व नाहींसें झालेलें दिसत असल्यामुळें या प्रसंगीं इंग्लंडाची कशी दशा होईल याची मोठी काळजी आहे. इंग्लंड वाह्या सरसावून रशियाशीं लढण्यास तयार आहे असें त्याच्या उद्गारांवरून दिसतें, पण काळ्यासमुद्रांत हवी तितकीं लढाऊ गलबतें ठेवण्याची जेव्हां रशियानें तहाविरुद्ध वर्तणूक केली त्यावेळींही इंग्लंडानें आरंभीं असाच बाह्या सरसावल्या असून शेवटीं "आपल्या मिशा खालीं" असें म्हणून रशियास हवें तसें वागण्यास परवानगी दिली; तेव्हां या वेळच्या बाह्या सरसावण्यांत कितीसा अर्थ आहे हें आज कांहींच सांगवत नाहीं. "आम्हांस टर्कीच्या हिताकडे पहाण्याचें कारण नाहीं, पण आम्ही आपल्या हिताकरतां झटण्यास तयार आहों" असें जरी इंग्लंडचें म्हणणें आहे तरी टर्की स्वतंत्र रहाण्यांतच इंग्लंडचें हित असल्यामुळें ही लढाई सुरू झाल्यास इंग्लंडास टर्कीचें सहाय करणें भाग आहे. इंग्लंडास जो आज थोरपणा आला आहे व मोठाल्या राज्यांत जी इंग्लंडची गणना होत आहे ती बहुतेक अंशीं हिंदुस्थानामुळेंच असून टर्की रशियाच्या हातांत गेल्यास युरोपांतून हिंदुस्थानांत येण्याचा रस्ता रशियाच्या हातांत जाणार आहे व आज कित्येक वर्षांपासून रशियाचा डोळा हिंदुस्थानावर असून तो त्या दिशास क्षणोक्षणीं पुढें सरकत असल्यामुळें टर्कीचें नाकें रशियाच्या हातांत गेल्यावर हिंदुस्थान इंग्रजांच्या हातून हिसकून घेण्याचें जर रशिया मनांत आणील तर त्यास फारसे प्रयास लागणार नाहींत, आणि याचमुळें या प्रकरणांत इंग्लंडानें पडणें जरूर झालें आहे. आज जी आमची स्थिति आहे ती नसून, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, वगैरेसारखी असती तर या बाबतींत विचार करण्याचें फारसें कारण नसतें, पण आमची स्थिति फार वेगळी व इंग्लंडावर अवलंबून असल्यामुळें, आणि आमच्या उपजीविकेस लागणारे मिठापासून सर्व पदार्थ इंग्लंडहून येतील तरच आमचें चालेल असें असल्यामुळें आम्हास यासंबंधानें विचार करणें भाग झालें आहे. शिवाय आम्ही स्वतंत्र असतों तर इंग्लंड व रशिया या दोघांविषयींही आम्हास काळजी नसती, पण परतंत्र आणि गुलामांच्या स्थितींत असल्यामुळें या तंट्याचा परिणाम इसापनीतींतील बेडकाप्रमाणें आमच्यावर होऊं नये म्हणून फार काळजी वाटत आहे. शिवाय वेळीं आपलें शूरत्व दाखविण्याच्या स्थितींत जरी इंग्लंडानें आम्हास ठेवलें असतें तरीही टर्कीचें नाकें रशियाच्या हातांत गेल्यास फारशी भीति वाटली नसती, कारण रशियानें जरी तें नाकें घेतलें तरी वेळ आल्यास रशिया किंवा दुसऱ्या कोणत्याही शत्रूस दरडावण्यास आम्हीच तयार झालों असतों पण आमच्या कोत्या बुद्धीचे सरकारानें आम्हा सर्वांस थोटें, लुळे व पांगळे करून टाकलेले असल्यामुळें आम्हास तिकडूनही आशा करण्यास नसल्यामुळें फार वाईट वाटतें. असो, ईश्वर समर्थ आहे व तोच आमच्या संरक्षणाची काळजी करो.

अ. द.

---


## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई बांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. या त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

खामगाव तारीख १४ माहे सप्तंबर सन १८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent

---

## नोटिस
## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावें कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतारू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................... १ रुपया
नेटिव लोक .... ................ ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोंचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग म्हणजे बैल गाडीनें माल पोंचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राकटर यांच्या नावानें पाठवावा.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.
NOTICE

## ग्रेट इंडियन पेनिनूसुला रेलवे.
## नोटिस.

DELHI ASSEMBLAGE—
CHEAP RETURN
TIKETS.

## दिल्ली दरबार- स्वस्त रिटर्न टिकिटें.

जाहिर करण्यांत येतें कीं ह्या रेलवेच्या सर्व स्टेशनांवर दिल्लीस जाण्याकरितां जबलपुरपर्यंतचीं पहिल्या आणि दुसऱ्या क्लासाचीं स्वस्त रिटर्न टिकिटें देण्यांत येतील व असें टिकिट घेणाऱ्या प्रत्येक मनुष्यास जबलपुरास जाऊन परत येण्यासि तिसऱ्या क्लासाचे नोकराचें टिकिट मिळण्यास हक्क आहे. हीं टिकिटें येत्या दिसेंबर महिन्याच्या पंधराव्या तारखेस व मध्यंतरीं मिळतील व तीं येत्या जानेवारी महिन्याचे पंधरावे तारखेस व त्यापूर्वीं कोणत्याही दिवशीं परत येण्यास उपयोगीं पडतील व नाव्या येण्या बद्दलच्या ह्या टिकिटांस फक्त जाण्याच्या टिकिटांच्या सवापट किंमत पडेल.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ४ माहे जुलै
सन १८७६ इसवी.

---

## READY FOR SALE

the
CODE OF CIVIL PROCEDURE.
BEING
Acts VIII of 1859 and XXIII of 1861, with decisions Contained in the Bombay High Court and the Indian Law Reports, from 1862 to the end of August 1876. Price Rs. 2—8, if paid before the 1st October next, and Rs. 3 afterwards. For outsiders annas 4 in addition for postage. Books sold will bear the signature of either of the undersigned. Apply to

GUNGADHUR V. LIMAYE
Pleader, Shunwar Peit.
PANDURANG BACHAJEE
Pleader, near Panjarpole.

Poona
1st Sept. 1876

N. B. A. Digest of cases on Hindoo and Mahomedan Laws and the Indian Succession Act, is under preparation.


---

हे पत्र अकोले एथें लॅंडराव बाळाजी रुडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. म